रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १२
www.ramprahar.com

मंगळवार २९ जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

'त्या' अपघातातील आणखी दोघांचा मृत्यू/२
पनवेल एसटी आगारात नवीन बसेस दाखल/३
खंडाळा घाट अवजड वाहनांमुळे धोकादायक/७

## 'देशातील सर्वोत्तम आरोग्य व्यवस्था महाराष्ट्रात निर्माण करू'



**नागपूर :** प्राथमिक आरोग्य सुविधांच्या दृष्टीने प्रत्येक तीन किलोमीटरमध्ये आरोग्यसेवांचे जाळे निर्माण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. येत्या चार वर्षांत देशातील सर्वोत्तम आरोग्य व्यवस्था महाराष्ट्रात निर्माण करण्यात येणार आहे. येत्या काळात सिकलसेल, थॅलेसिमिया, निमियावरील महागड्या उपचारासाठी एक नवीन योजना तयार करणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी येथे केले. लष्करीबाग येथील कमाल चौकात स्व. भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्थेद्वारा संचालित स्व. भानुताई गडकरी मोमोरियल डायग्नोस्टिक सेंटरचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते. हे केंद्र आरोग्य सेवेच्या क्षेत्रात मैलाचा दगड ठरेल, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी व्यक्त केला.

# महाराष्ट्राची लेक दिव्या देशमुख ठरली बुद्धिबळाची राणी; विश्वविजेतेपदावर मोहोर

**जॉर्जिया : वृत्तसंस्था**

जॉर्जिया देशातील बटुमी शहरात पार पडलेल्या महिला बुद्धिबळ वर्ल्ड कपच्या अंतिम फेरीत महाराष्ट्राच्या दिव्या देशमुखने इतिहास रचला. तिने अनुभवी आणि उच्च मानांकन असलेल्या कोनेरू हम्पीचा पराभव करत हे प्रतिष्ठेचे विजेतेपद आपल्या नावे केले.

असे विजेतेपद पटकवणारी ती पहिलीच भारतीय महिला ठरली आहे. सामन्याच्या मुख्य फेऱ्यांमध्ये दोन्ही खेळाडूंमध्ये एक रोमांचक सामना पाहायला मिळाला. दिव्याने कोणतीही चूक न करता हम्पीला ड्रॉवर रोखले आणि सामना टायब्रेकरपर्यंत नेला. टायब्रेकरमध्ये काळ्या मोहरांवर खेळताना दिव्याने अत्यंत हुशारीने आणि आत्मविश्वासाने खेळ करत निर्णायक विजय मिळवला. सामन्यात एक क्षण असा आला होता, जिथे हम्पीकडे पुन्हा सामन्यात परतण्याची संधी होती, मात्र ती त्या संधीचे रूपांतर विजयात करू शकली नाही. दुसरीकडे, दिव्याने कोणताही चुक न करता ऐतिहासिक कामगिरी केली आणि महिला बुद्धिबळ वर्ल्ड कप जिंकला.

नागपूरची १९ वर्षांची दिव्या देशमुख आता केवळ वर्ल्ड कप विजेतीच नाही, तर तिने या ऐतिहासिक विजयासोबत ग्रँडमास्टरचा मानही मिळवला आहे. या क्षणी दिव्या खूपच भावूक झाली होती. तिच्यासाठी हे



आयुष्यातले अविस्मरणीय क्षण ठरले. विशेष म्हणजे, दिव्या आधीच 'कँडिडेट्स टूर्नामेंटसाठी पात्र ठरली आहे, जे बुद्धिबळ विश्वविजेतेपदाच्या वाटचालीतले एक महत्त्वाचे पाऊल आहे.

महिला वर्ल्ड कप २०२५ जिंकणाऱ्या दिव्या देशमुखला विजेतेपदाबरोबरच सुमारे ४२ लाख रुपयांचे पारितोषिक मिळाले आहे. उपविजेती कोनेरू हम्पी हिला ३५,००० डॉलर्स म्हणजेच सुमारे ३० लाख रुपये मिळाले. या दोन्ही खेळाडूंनी बुद्धिबळातील अत्यंत प्रतिष्ठेच्या कँडिडेट्स टूर्नामेंटसाठी पात्रता मिळवली आहे, जे विश्वविजेतेपदाच्या दिशेने एक मोठे पाऊल मानले जाते. भारतामध्ये बुद्धिबळाचे क्रेझ वेगाने वाढत आहे, आणि त्यामुळे या दोघींनाही नवीन स्पॉन्सर्स, ब्रँड डील्स आणि व्यावसायिक संधी मिळण्याची शक्यता प्रचंड आहे. भारताची बुद्धिबळाची दुनिया आता नवी दिशा घेत आहे, आणि दिव्या देशमुख या प्रवासाची आघाडीची खेळाडू ठरली आहे.

### भारतीय लष्कराचे ऑपरेशन महादेव

# पहलगाम हल्ल्याच्या मास्टरमाईंडचाही खात्मा

**श्रीनगर : वृत्तसंस्था**

पहलगाममध्ये हल्ला केल्यानंतर चार दहशतवादी पसार झाले होते. त्यामुळे पहलगाममध्ये निष्पाप भारतीयांची हत्या करणाऱ्यांना शिक्षा कधी मिळणार असा प्रश्न उपस्थित केला जात होता. दरम्यान, सोमवारी (दि.२८) भारतीय लष्कराने ऑपरेशन महादेव राबवत श्रीनगरमधील लिडवास परिसरात तीन दहशतवाद्यांचा खात्मा केला. यात पहलगाममध्ये हल्ला करणाऱ्या मास्टमाईंडचाही समावेश आहे

२२ एप्रिल २०२५ रोजी पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर भारतीय संरक्षण दलांनी ऑपरेशन सिंदूर राबवत या हल्ल्याचा बदला घेतला होता, मात्र हा हल्ला करणारे चार दहशतवादी पसार झाले होते. त्यामुळे पहलगाममध्ये निष्पाप भारतीयांची हत्या करणाऱ्यांना शिक्षा कधी मिळणार असा प्रश्न उपस्थित केला जात होता. दरम्यान, सोमवारी भारतीय लष्कराने ऑपरेशन महादेव राबवत श्रीनगरमधील लिडवास परिसरात तीन दहशतवाद्यांचा खात्मा केला. हे तिन्ही



दहशतवादी पाकिस्तानी असल्याची माहिती समोर येत आहे. लष्कराने ठार केलेल्या दहशतवाद्यांपैकी हाशिम मुसा हा पहलगालम हल्ल्यातील मास्टरमाइंड असल्याचे समोर आले आहे तसेच लष्कराशी झालेल्या चकमकीत ठार झालेल्या दहशतवाद्यांचे फोटोही समोर आले आहेत.

लिडवासमधील चकमकीत ठार झालेला दहशतवादी हाशिम मुसा हा पहलगाम हल्ल्यातील मास्टरमाईंड होता. तसेच त्याने सोनमर्ग टनेल येथेही मोठा हल्ला घडवून आणला होता. त्या हल्ल्यात सात जण मारले गेले होते. त्यांच्यामध्ये सहा मजूर आणि एका डॉक्टरचा समावेश होता.

हाशिम मुसा हा लष्कर ए तोयबाचा टॉप कमांडर होता. त्याला सुलेमान शाह मुसा फौजी या नावानेही ओळखले जात असे. तो पाकिस्तानच्या एसपीजीमधील पॅरा कमांडो होता. पहलगाम हल्ल्यानंतर तो दाचीगाम आणि लिडवासच्या जंगलांमध्ये लपून बसला होता. तिथून तो पाकिस्तानमध्ये पळण्याच्या तयारीत होता.

दरम्यान, लिडवास येथे सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीचे फोटो समोर आले आहेत. त्यामध्ये ठार करण्यात आलेल्या दहशतवाद्यांचे मृतदेह आणि हत्यारे दिसत आहेत. या कारवाईदरम्यान, लष्कराने स्वदेशी ड्रोन आणि रडारचा वापर केला. ड्रोनच्या माध्यमातून दहशतवाद्यांच्या हालचालींवर रात्रभर नजर ठेवली गेली. तसेच थर्मच कॅमेऱ्यांच्या माध्यमातूनही त्यांचा शोध घेतला गेला. त्याशिवाय आयईडी नष्ट करण्यासाठी रोबोटचा वापर करण्यात आला. अखेरीस आज सकाळी बराच वेळ चाललेल्या चकमकीनंतर लष्कराने इथे लपलेल्या तिनही दहशतवाद्यांना कंठस्नान घालण्यात यश मिळवले.

# खारघर परिसरात दारूबंदी करण्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांची जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा

**अलिबाग : प्रतिनिधी**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली खारघरमधील सर्वराजकीय पक्ष पदाधिकारी, संघर्ष समिती कार्यकर्ते यांनी रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांची सोमवारी (दि.२८) जिल्हाधिकारी कार्यालयात भेट घेऊन त्यांच्याशी खारघर येथे कायमस्वरूपी दारूबंदी करण्याबाबत चर्चा केली.



जिल्हाधिकारी यांच्या दालनात झालेल्या या बैठकीला राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्यासह राज्य उत्पादन शुल्क अधिकारी उपस्थित होते.

या मीटिंगमध्ये खारघर मधील कायमस्वरूपी दारूबंदी घोषित करण्यासंदर्भात करावयाची शासकीय प्रशासकीय मतदान प्रक्रिया याबाबत चर्चा करण्यात आली. करण्याबाबत राज्यशुल्क अधिकारी व जिल्हाधिकारी रायगड यांनी उभी बाटली आडवी बाटली निवडणूक प्रक्रिया कशी करावी याबद्दल मार्गदर्शन केले. ज्या ठिकाणी इलेक्शन करायचे आहे तेथून २५ टक्के मतदारांचे निवडणुकीसाठी अर्ज केल्यास मतदान घेतले जाईल. विधानसभेची मतदार यादी या प्रक्रियेसाठी वापरण्यात येईल. निवडणूक प्रक्रिया जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे राबवण्यात येईल, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

खारघर संघर्ष समितीला दारूबंदीसाठी व निवडणूक प्रक्रियेसाठी लागणारे सर्व प्रकारे सहकार्य करण्याचे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडताना खारघर परिसरातील नागरिकांची दीर्घकाळाची दारूबंदीची मागणी केली होती. खारघरमध्ये पहिल्यांदा २००२ साली दारू विक्रीचा परवाना दिला गेला. त्या आधी या ठिकाणी कुठलाही दारूचा परवाना नव्हता आणि त्या अनुषंगाने दारू विक्रीचे त्या ठिकाणी दुकान नव्हते. २००२ साली या ठिकाणी पहिला परवाना दिला गेला होता आणि तेव्हापासून या दारू विक्रीला विरोध सुरू झाला. आणि त्यानुसार वेगवेगळ्या पद्धतीची निवेदन देत दारूबंदीच्या संदर्भामध्ये मागणी होत या ठिकाणी दारूबंदी झाली आणि तसा ठरावही तत्कालीन खारघर ग्रामपंचायतीने केला. दारू विक्री सुरू होत आहे आहे कळताच दारूबंदीसाठी या ठिकाणी वेगवेगळ्या टप्प्यावरती या दारूच्या दुकानांच्या विरोधामध्ये आंदोलन होत राहिले आहेत.दारूबंदीसाठी राजकीय व सामाजिक संघटना एकत्र येऊन संघर्ष नावाची संस्था स्थापन केली आणि त्या अनुषंगाने संघर्ष संस्थेच्या माध्यमातून चळवळ उभी राहिली आणि या चळवळीचा इतिहास हा प्रचंड मोठा आहे आणि या माध्यमातून या ठिकाणी दारूच्या दुकानांवरती सातत्याने बंदीची मागणी होत आली. आतापर्यंत तीन हॉटेलला परवानगी मिळाली आहे त्यामध्ये स्वतःला फोर स्टार समजणारे एक हॉटेल, निरसूख पॅलेस, जेजे रसोई एवढ्यालाच त्या ठिकाणी आतापर्यंत परवानगी मिळाली आणि तीसुद्धा कायद्याचे पळवाटा शोधूनच त्या ठिकाणी त्यांनी परवानगी मिळवली या सगळ्याच्या विरोधामध्ये सातत्याने खारघरच्या नागरिकांनी संघर्ष केलेला आहे आणि **(पान २ वर..)**

> **खारघरमध्ये संपूर्ण दारूबंदी करण्याबाबत मी विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडून या प्रश्नावर सभागृहाचे लक्ष वेधले होते. आज जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन खारघरमध्ये संपूर्ण दारूबंदी करण्यासाठी मतदानाबाबत चर्चा केली. खारघरमधील तीन प्रभागांमधील २५ टक्के मतदारांनी संपूर्ण दारूबंदीसाठी अर्ज दिल्यास मतदान घेता येईल असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले आहे. त्यानुसार २५ टक्के मतदारांचे अर्ज आम्ही देणार आहोत.**
>
> **-आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल विधानसभा मतदारसंघ**



**अलिबाग : तालुक्यातील बहिरेश्वर मत्स्य व्यवसाय विकास मच्छीमार सहकारी संस्था धेरंड मर्यादित मच्छीमार संघटनेला शासनाकडून मंजूर अनुदान लवकरात लवकर मिळावे, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली असून या संदर्भात अलिबाग येथे सोमवारी मत्स्यव्यवसाय अधिकारी संजय पाटील यांच्यासोबत बैठक पार पडली. या वेळी त्यांच्यासमवेत मच्छीमार संस्थेचे पदाधिकारी आणि मच्छीमार बांधव उपस्थित होते.**

## निवडक

### काँग्रेसचे दोन बडे नेते करणार भाजपत प्रवेश

**जालना :** काँग्रेसला जालन्यात मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसचे माजी आमदार कैलास गोरंट्याल आणि पाथरीचे माजी आमदार सुरेश वरपूडकर हे भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. सुरेश वरपूडकर हे मंगळवारी भाजपात प्रवेश करणार आहेत. तर कैलास गोरंट्याल यांचा एक तारखेनंतर भाजपात पक्ष प्रवेश होणार असल्याची माहिती समोर आली आहे, कैलास गोरंट्याल यांच्यासोबत काही नगरसेवकही भाजपात प्रवेश करणार आहेत.

### पर्यटन प्रचार व प्रसारासाठी नव्या धोरणांची अंमलबजावणी

**नवी मुंबई :** राज्यातील पर्यटन उद्योगाच्या प्रचार व प्रसारासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. महाराष्ट्राच्या पर्यटनाच्या प्रतिमानिर्मिती आणि ब्रँडिंगसाठी खास धोरणे अंमलात आणली जात आहेत. या योजनेंतर्गत स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये सहभागी होणाऱ्या संस्थांना अनुदान व सहकार्य दिले जाणार आहे. यात खाजगी संस्था, स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था व अन्य आयोजक समाविष्ट आहेत.

# भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाणांनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सोमवारी (दि.२८) नवी दिल्ली येथे



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीत महाराष्ट्र भाजपची संघटनात्मक घडामोडी, आगामी कार्यक्रमांचे नियोजन व पक्षवाढीची दिशा याबाबत सविस्तर माहिती चव्हाण यांनी पंतप्रधान मोदी यांना दिली.

जानेवारी ते जून २०२५ या कालावधीत भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष म्हणून केलेल्या पक्षकार्याचा अहवाल या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे सुपूर्द केला. या पक्षकार्य अहवालात महाराष्ट्रात बूथ पातळीवर सुरू असलेले संघटनकार्य, सदस्य नोंदणी मोहिम, पदाधिकाऱ्यांचे प्रशिक्षण, संपर्क अभियान आणि महिला-युवा आघाड्यांच्या उपक्रमांचा सविस्तर आढावा आहे.

आगामी काळात महाराष्ट्रातील पक्ष संघटनेला बळकटी देण्यासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून रवींद्र चव्हाण यांना मार्गदर्शन लाभले. चव्हाण यांनी महाराष्ट्रातील संघटनात्मक कामाचा आढावा पंतप्रधानांना सादर केला. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी चव्हाण यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# प्रत्येक कामात जिद्द आणि धाडस हवे

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रतिपादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रत्येक काम हे जिद्द आणि धाडसाने केले तर अशक्य असे काहीच नाही हे कांडपिळे कुटूंबाने दाखवून दिले आहे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नढाळ येथे अशोक लेलँडच्या वर्कशॉपच्या उद्घाटनावेळी केले.

जुन्या मुंबई पुणे हायवेवरील नढाळ येथे नव्याने अशोक लेलँड वाहनांचे आक्स फ्लीटवर्क हे वर्कशॉप सुरू करण्यात आले आहे. अनुप कांडपीळे यांनी सुरू केल्या या वर्कशॉपचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि.२८) झाले. या वेळी त्यांनी कांडपीळे कुटूंबीयांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांनी ही शुभेच्छा दिल्या तसेच अनुप कांडपीळे यांनी आपल्या शिक्षणाचा शिक्षणाचा वापर पुरेपुर केला असून ते व्यवसायात नफी यशस्वी होतील असा विश्वास व्यक्त केला.

या कार्यक्रमावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक अजय कांडपीळे, तेजस कांडपीळे, मनोहर कांडपिळे, वैभव देशमुख, गौरव कांडपीळे, अविनाश शिंदे, अनुप कांडपीळे यांच्यासह अशोक लेलँडचे अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

# महाड ड्रग्ज कारवाईप्रकरणी फरार कारखानामालक ताब्यात

**महाड : प्रतिनिधी**

महाड औद्योगिक वसाहतीतील एका रासायनिक कारखान्यावर बुधवारी पोलीस व अंमली पदार्थ नियंत्रण विभाग (एनसीबी) यांच्या संयुक्त कारवाईतून सुमारे ८८.९२ कोटी किंमतीचा किटामाईन अमली पदार्थ जप्त करण्यात आला होता. यामध्ये चार आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला होता मात्र कारखाना मालक फरार झाला होता त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या एका पोलिसाला मिळालेल्या माहितीनंतर बुधवार दिनांक २३ जुलै २०२५ रोजी पोलीस आणि अमली पदार्थ एनसीबी यांनी केलेल्या संयुक्त कारवाईमध्ये महाड एमआयडीसीमधील रोहन कारखान्या मध्ये सुमारे ८८.९२ कोटी किंमतीचा किटामाईन अमली पदार्थ सापडला होता. त्यानंतर चार आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याच वेळी तीन आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले होते कंपनी मालक रोहन प्रभाकर गवंस (रा.चिंचोली बंदर मालाड वेस्ट) हा फरार झाला होता. पोलिसांमार्फत त्याचा तपास सुरू होता. अखेर त्याला स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने मुंबईहून अटक केली असून न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या आरोपीवर आधीही गुन्हा दाखल असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

# पाषाणे डॅममध्ये तरुणी बुडाली

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील वांगणीजवळील पाषाणे डॅममध्ये पोहण्यासाठी गेलेली कोलकात्याची ३० वर्षीय तरुणी पाण्यात बुडाल्याची घटना घडली आहे. संगीता चक्रवर्ती असे बुडालेल्या तरुणीचे नाव असून, नेरळ पोलीस स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने तिचा शोध घेत आहेत.

कोलकत्ता येथील राहणारी संगीता ही आपल्या चंदीगड येथील राहणारी मैत्रिणसोबत वांगणी येथील काराव ब्रेन फ्रीडम (नशा मुक्ती केंद्र) येथे सोबत आली होती. दरम्यान, मोटरसायकलवर या दोघी मैत्रीणी काराव आणि खडकपाडा या दोन गावांच्या मध्ये असणारे वांगणी पाषाणे डॅम येथे फिरण्यासाठी म्हणून गेले होते. **(पान २ वर..)**

### अलिबागजवळील बोट दुर्घटना

# बेपत्ता मच्छिमारांचे मृतदेह सापडले

**अलिबाग : प्रतिनिधी**

खांदेरी किल्ल्याजवळ बोट बुडून बेपत्ता झालेल्या तीन मच्छीमारांचे मृतदेह सोमवारी (दि.२८) सापडले, अलिबाग तालुक्यातील दिघोडे, सासवणे आणि किहीम येथे हे मृतदेह आढळून आले आहेत.

मासेमारी बंदी लागू असताना उरण तालुक्यातील करंजा येथील मनोहर गणपत कोळी यांची तुळजाई नावाची बोट शनिवारी खोल समुद्रात मासेमारीसाठी गेली होती. समुद्र खवळलेला असल्याने, लाटांच्या तडाख्यात सापडून ही बोट बुडाली. त्यावेळी बोटीत एकून आठ मच्छीमार होते. बोटीतील पाच मच्छीमार पोहून किनाऱ्यावर आले होत, मात्र बोटीतील तीन मच्छीमार बेपत्ता होते, तेव्हापासून त्यांचा शोध सुरू होता.

तटरक्षक, पोलीस, महसूल विभाग आणि स्थानिक ग्रामपंचायतीकडून या बेपत्ता मच्छीमारांचा शोध घेत होते. शोध मोहीमेसाठी ड्रोन कॅमेऱ्यांची मदत घेण्यात आली होती, मात्र तिघांचा ठावठिकाणा लागत नव्हता. अखेर सोमवारी सकाळी तिघांचेही मृतदेह अलिबाग तालुक्यातील दिघोडे, सासवणे आणि किहीम येथे आढळून आले.

नरेश राम शेलार, धीरज काशिनाथ कोळी आणि मुकेश यशवंत पाटील या तिघांचा बुडून मृत्यू झाला आहे. पोलिसांनी पंचनामा करून तिघांचे मृतदेह ताब्यात घेतले, त्यानंतर ते शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले. **(पान २ वर..)**

# 'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपचे निर्विवाद वर्चस्व दाखवून द्या'

**वर्धा : प्रतिनिधी**

राज्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील. सुरुवातीला जिल्हा परिषदेची निवडणूक आणि त्यानंतर नगरपालिकेची निवडणूक होईल आणि कदाचित सर्वात अखेरीस महापालिकेची निवडणूक होईल. या निवडणुका आपण महायुतीमध्ये एकत्र लढणार आहोत. स्थानिक स्तरावर काही निर्णय घेण्याचे अधिकार आम्ही देऊ. जिथे अडचणी असतील तेथील लोकांना आमच्याशी चर्चा करावी, पण शक्यतो निवडणुका महायुतीत करायच्या, जिथे महायुतीत निवडणूक होणार नाही, तिकडे आपल्या मित्रपक्षावर कुठलीही टीका करायची नाही. आपण राज्यात सोबत काम करत आहोत, त्यामुळे आपल्या मित्रपक्षांवर टीका करायची नाही. आपण २०१७ साली बघितले, उद्धवजी आपल्यासोबत सत्तेत होते, रोज आपल्यालाच शिव्या द्यायचे, ते आपल्याला करायचे नाही. महायुती होणार नाही तिथे आपल्याला समन्वय ठेवून मैत्रीपूर्ण लढत करायची आहे, पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपल्या भाजपचं निर्विवाद वर्चस्व दाखवून द्यायचं आहे, असा आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपच्या कार्यकर्त्यांना दिला. ते सोमवारी वर्धा येथे आयोजित करण्यात आलेल्या भाजप कार्यकर्त्यांच्या महामंथन मेळाव्यात बोलत होते.



माझी एक विनंती आहे की, राज्यात आपल्यासाठी अनुकूलता आहे. लोक आपल्याला निवडून द्यायला तयार आहेत. पण भाजप पार्टी म्हणून अनेक जिल्ह्यात लहानसहान वाद आहे, हे वाद नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये आहेत. भाजप हा परिवार आहे, दोन भावांमध्ये कमी अधिक होत असतं. पण निवडणुकीच्या तोंडावर सगळ्यांनी एकत्र राहिलं पाहिजे, बसलं पाहिजे, वाद संपवले पाहिजेत. बघा, अनेक पार्ट्यांचं पतन याकरता झालं, एकाने दुसऱ्याला ओढलं आणि दुसऱ्याने पहिल्याला ओढलं आणि दोघांनी मिळून पार्टीला खड्यात घातलं. अशाप्रकारे आपल्या पार्टीत होता कामा नये. कोणी जर पार्टीला खड्ड्यात घालण्याचं काम करत असेल तर त्याला खड्ड्यात घालण्याचं काम पार्टी करेल एवढं लक्षात ठेवा, असा इशारा देवेंद्र फडणवीस यांनी दिला.

सध्या आपल्या पक्षात सगळीकडे कार्यकर्ते उपलब्ध आहेत. याचं मोठं उदाहरण म्हणजे यापूर्वी शिवसेनेच्या नावावर एका दिवसात रक्तदान शिबिरात २५ हजार बाटल्या करण्याचा विक्रम होता, पण २२ जुलैला आपल्या अध्यक्षांनी आदेश दिल्यावर भाजपच्या कार्यकर्त्यांनी इतकं रक्तदान केलं की, एका दिवसात रक्ताच्या ७८ हजार बाटल्या गोळा झाल्या. आपण मनावर घेतल्यावर काय करु शकतो, हे याचं उत्तम उदाहरण आहे.

# खारघरच्या 'त्या' अपघातातील आणखी दोघांचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

खारघर येथील हिरानंदानी उड्डाणपुलावर ९ जुलै रोजी पहाटे घडलेल्या अपघातातील गंभीर जखमी तरुणांपैकी आणखी दोन तरुणांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे या अपघातातील मृतांची संख्या आता तीन झाली आहे. धारावी येथील एका डान्स ग्रुपमधील या तरुणांच्या आनंददायी सहलीचे रूपांतर एका दुःखद घटनेत झाल्याने त्यांच्या डान्स ग्रुपवर तसेच मृतांच्या कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे. या अपघातानंतर फरार झालेला कारचालक वैभव डेरे (वय २४) याच्याविरोधात खारघर पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्याला अटक केली असून सध्या तो न्यायालयीन कोठडीत असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.




या अपघातातील मृत व जखमी तरुण मुंबईतील धारावी येथे राहणारे असून ते डान्स ग्रुपमध्ये काम करत होते. आठ जुलैच्या मध्यरात्री सहा दुचाकीवरून लोणावळ्याला फिरण्यासाठी जात असताना ९ जुलै रोजी पहाटेच्या सुमारास ते खारघर येथीलहिरानंदानी उड्डाणपुलावर पोहोचले असताना, पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या सफेद रंगाच्या कारने सुरुवातीला मानव कुंचीकोरवे याच्या स्कुटीला जोराची धडक दिली. या घटनेत तो पुलावरून खाली फेकला गेला. त्यानंतर या कारने या तरुणांच्या इतर चार दुचाकींनाही धडक दिली.

त्यानंतर चालक कार घटनास्थळी सोडून तेथून फरार झाला होता. या अपघातातील सर्व जखमींना कामोठे येथील एमजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असता यात गंभीर जखमी झालेल्या मानव कुंचीकोरवे (वय २२) याचा मृत्यू झाला. तर सुभान शेख, इस्तियाक अन्सारी, नवीन रावा, महेश गड्डे, संकेत सिंग, साहील कुंचीकोरवे, मुकुल ऊर्फ लकी कोळी, आशिषकुमार शाहु तसेच सागर देवल्ला व समीर मोहम्मद यांच्यावर एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यातील सागर देवल्ला व समीर मोहम्मद यांचाही मृत्यू झाला आहे. या अपघातानंतर पळून गेलेला कार चालक वैभव डेरे याच्याविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आल्याची माहिती खारघर पोलीस ठाण्याचे व.पो.नि. अजय कांबळे यांनी दिली.

# रोह्यात कावड यात्रेचे भाजपातर्फे भव्य स्वागत

**धाटाव : प्रतिनिधी**

उत्तर भारतीय समाज रोहा यांनी पारंपरिक कावड यात्रा मोठ्या भक्तिभावाने श्री तीर्थक्षेत्र स्वयंभू महादेव मंदिर, रोहा येथे पार पडली. यानिमित्ताने भारतीय जनता पक्षाच्या वतीने यात्रेकरूंचे श्रावणी सोमवारी दि. (२८) रोजी एक्सेल स्टॉप वर जल्लोषात स्वागत करत त्यांच्या सेवेसाठी चहा, नाश्ता व पाण्याची उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली.

या स्वागताने श्रद्धाळूंच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले. सुमारे १५० हून अधिक यात्रेकरू कावड खांद्यावर घेत, हर हर महादेवच्या गजरात मंदिरात दाखल झाले. भक्तीभावाने ओथंबलेली ही यात्रा रोह्याच्या धार्मिक आणि सामाजिक परंपरेला साजेशी ठरली.यावेळी दक्षिण रायगड जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, भाजप युवा मोर्चा जिल्हा चिटणीस नरेश कोकरे, रोहा तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे, भाजपा बुथ अध्यक्ष सचिन मोरे, निलेश धुमाळ, अश्विनी घाग , अदीती घाग , संकेत मोरे, सौरभ जोगडे, अमोल गंधाले, अमोल सानप , राजेश मोरे यांच्यासह भाजपाचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यकर्त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन भाविकांची मनोभावे सेवा केली. पाण्याचे बाटल्या, चहा व नाश्त्याची किट वाटप करत अतिथींच्या स्वागतात कोणतीही कमी राहू दिली नाही. भाविकांनी या व्यवस्थेचे व स्वागताचे मनापासून कौतुक केले. आम्ही पायी आलो आणि येथे भक्तीबरोबरच सेवा व आत्मीयता अनुभवली, असे उद्गार अनेक यात्रेकरूंनी यावेळी काढले. या उपक्रमातून भाजपाच्या सामाजिक भान व सेवाभावी कार्याची झलक पुन्हा एकदा दिसून आली. धार्मिक

## माणगावमध्ये आरोग्याचा महाउत्सव; अमरदीप ट्रस्ट तर्फे व्यापक वैद्यकीय सेवा

**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील माणगांव येथील एक अत्यंत प्रतिष्ठित सामाजिक संस्था म्हणून ओळखली जाणारी अमरदीप संस्था यांच्यावतीने रविवारी,(दि. २७) रोजी माणगाव येथे भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. दीर्घ काळानंतर आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला ग्रामस्थ आणि परिसरातील नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला.

या शिबिरात तब्बल ३५० हून अधिक लाभार्थ्यांनी सहभाग घेतला. यानंतरही शेजारच्या तालुक्यांमधून नागरिकांचा ओघ चालूच होता. हे वैद्यकीय शिबीर आरोग्य संवर्धन न्यास या नोंदणीकृत संस्थेच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आले होते.

# अभय योजनेचा नागरिकांनी घेतला लाभ

## एका दिवसात ८.५ कोटी मालमत्ता कराचा भरणा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मालमत्ता कराच्या वसुलीसाठी पनवेल महापालिकेने जोरदार कार्यवाही सुरू केली आहे. महापालिकेने मालमत्ता करधारकांसाठी अभय योजना सुरू केली आहे. यामुळे नागरिकांचा मालमत्ता कर भरण्याकडे मोठ्या प्रमाणात कल वाढला आहे. गेल्या १८ जुलै पासून अभय योजना सुरू केल्यापासून आजवरचा सर्वाधिक विक्रम आज झाला असून सुमारे ८.५ कोटीचा भरणा महापालिकेकडे जमा झालेला आहे.

मालमत्ता कराची थकीत वसूली करण्याकरिता महापालिकेने अभय योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत संपुर्ण मालमत्ताकर एकरकमी भरल्यास शास्तीमध्ये ९० टक्के सूट मिळणार आहे. तसेच १६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट या कालाधीत संपुर्ण मालमत्ताकर एकरकमी भरल्यास शास्तीमध्ये ७५ टक्के सूट मिळणार. तसेच या पुढील काळात म्हणजे १ सप्टेंबर २०२५ ते १० सप्टेंबर कालावधीत संपुर्ण मालमत्ताकर एकरकमी भरल्यास शास्तीमध्ये ५० टक्के सूट मिळेल. आणि ११ सप्टेंबर ते २० सप्टेंबर या कालाधीत संपुर्ण मालमत्ताकर एकरकमी भरल्यास असलेल्या शास्तीमध्ये २५ टक्के सूट मिळणार आहे. ही अभय योजना केवळ एकवेळची विशेष आणि अंतिम बाब म्हणून जाहीर करण्यात आली आहे. ऑनलाईन भरल्यास २टक्के सलवत पनवेल महानगरपालिकेच्या वेबसाईट, PMC TAX APP अथवा पनवेल कनेक्ट ॲपद्वारे नागरिकांनी मालमत्ता कर ऑनलाईन भरल्यास त्यांना २ टक्के सवलत मिळेल तसेच चालू वर्षाचा म्हणजे २०२५-२६ चा कर ३१ जुलैपर्यंत भरल्यास त्यांना या करामध्ये ५ टक्के सूट मिळेल

# सर्व्हेक्षण समितीची कर्जत एसटी आगाराला भेट

**कर्जत : प्रतिनिधी**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बस स्थानक अभियानांतर्गत सर्व्हेक्षण समितीने काल सायंकाळच्या सुमारास अचानक कर्जत एस टी आगाराला भेट दिली व सर्व परिसराची पाहणी केली तसेच कार्यालयीन कागदपत्रांची तपासणी केली. समितीने कर्जत आगाराच्या कारभाराबद्दल समाधान व्यक्त करून अधिक चांगले आगार होण्यासाठी महत्वाच्या सूचना केल्या.

दुपारी तीनच्या सुमारास रत्नागिरी जिल्ह्याचे विभाग नियंत्रक प्रज्ञेश बोरसे यांच्या अध्यक्षतेखालील सर्व्हेक्षण समिती कर्जत एस टी आगारामध्ये आली. विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी राजेश्वर जाधव, पत्रकार विजय मांडे, प्रवासी प्रतिनिधी विनोद चौधरी यांचा समितीमध्ये समावेश होता. आगार व्यवस्थापक देवानंद मोरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. वाहतुक नियंत्रक दीपक देशमुख, विलास बागुल यांच्या समवेत संपूर्ण आगार परिसराची पाहणी केली. यावेळी त्यांनी स्वच्छता गृहाच्या स्वच्छतेबाबत चांगला अभिप्राय दिला तसेच प्रवासी निवारा, सी एन जी पंपाची व्यवस्था, कार्यालयातील कामामध्ये वेगळ्या प्रकारच्या मांडणी बद्दल समाधान व्यक्त केले. मात्र स्वच्छतेबद्दल सूचना दिल्या.



आगार व्यवस्थापकांचे निवास स्थान तसेच इमारतींची दुरुस्ती याबाबत सूचना केल्या. कमी मनुष्यबळ असूनही आगार चांगल्या प्रकारे चालू आहे. याबाबत समिती सदस्यांनी प्रशंसोदगार काढले. समिती अध्यक्ष प्रज्ञेश बोरसे यांनी ' प्रवासी वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. परिसरात एखादे उद्यान विकसित करावे. प्रवासी व कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन करावे.' अशा सूचना केल्या. मोरे यांनी, ' आगारासाठी नवीन एस टी गाड्या आल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न आहे.' असे सूचित केले. सदस्य मांडे यांनी, 'हे आगार १९८० च्या दरम्यान सुरु झाले. आगारासाठी भरपूर जागा आहे. मात्र बहुतांश इमारती नादुरुस्त आहेत.



**मुरुड : चांद्रसेनीय कायस्थ प्रभु समाज व देवस्थान ट्रस्ट मुरुड गुरव पाखाडी येथील शिव मंदिरात पहिल्याच श्रावण सोमवारी शिवशंभोचा गजर करत शिवभक्तांनी अलोट गर्दी केली होती. शहरातील गुरव पाखाडी तील शेकडो वर्षांपूर्वी प्राचीन शिव मंदिरात पहिल्या पुजेचा मान नयन कर्णिक त्यांच्या पत्नी नौनिता कर्णिक यांना मिळाला.पहाटे शिव शंकराच्या पिंडीवर बेलाची पाने व दुधाने विधीवत पूजा करुन सहस्त्र बेल भगवान शंकराला अर्पण करण्यात आला.महावीर ज्वेलर्स यांच्या कडुन मंदिरात येणाऱ्या भाविकांसाठी प्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.**

**पान १ वरुन**

## खारघर परिसरात दारूबंदी करण्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांची जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा

आता ज्या वेळेला एक वाईन शॉप हे थेट मुंबईतल्या परवानगी शिफ्ट करून खारघर मधील मोठ्या व मुख्य रस्त्यावरती देण्यात आले. त्यामुळे लोकांच्या भावनांचा कडेलोट झालेला आहे. जर एखाद्या शहरातली लोकं ही दारूबंदी मागतात, मात्र केवळ कायद्यातल्या पळवाटा का दाखवल्या जातात असा सवाल करत दारूबंदीसाठी योग्य ती कार्यवाही झाली पाहिजे. आणि या संदर्भातील प्रक्रिया करण्यासाठी शासनाने पाठिंबा द्यावा, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी लक्षवेधी सूचनेतून मागणी केली होती.

सन २००८ व २००९ च्या अधिसूचनेनुसार नगरपरिषद / महानगरपालिका क्षेत्रातील एखाद्या प्रभागातील २५ टक्के पेक्षा कमी नसलेल्या महिला मतदार किंवा एकूण मतदारांनी लेखी निवेदन दिल्यास संबंधित जिल्हाधिकारी यथास्थिती गुप्त पद्धतीने मतदान घेण्याची प्रक्रिया पूर्ण करतील. जर संबंधित प्रभागातील एकूण मतदार किंवा महिला मतदारांच्या संख्येच्या किमान ५० टक्केपेक्षा अधिक अनुक्रमे एकूण मतदार किंवा महिला मतदार यांनी मद्य विक्रीची अनुज्ञप्ती बंद करण्याच्या बाजूने मतदान केल्यास त्या क्षेत्रात मद्यविक्री अनुज्ञप्ती बंद करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात येतात, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले होते.

## पाषाणे डॅममध्ये तरुणी बुडाली

सायंकाळीं पाच वाजण्याच्या सुमारास संगीता हिला डॅमघ्मध्ये पोहण्याचा मोह झाल्याने ती पाण्यात उतरली असता तिला पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने ती पाण्यात बुडाली. या वेळी सोबत असणाऱ्या मैत्रिणीने हा प्रकार गावात सांगताच सायंकाळी साडे सहा वाजता नेरळ पोलीस ठाण्याचे अधिकारी शिवाजी ढवळे हे आपल्या टीमला सोबत घेऊन पोहचले. स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने लागलीच धरणात बुडालेल्या तरुणीचा शोध घेण्यास सुरुवात केलेली आहे, मात्र अद्यापही तरुणी कुठे सापडून आलेली नाही. मुसळधार पाऊस कोसळत असून अंधार झाल्याने शोध मोहीम थांबवण्यात आली आहे.

## बेपत्ता मच्छिमारांचे मृतदेह सापडले

शवविच्छदनानंतर ते नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले आहेत. दरम्यान, बोटीतून बचावलेल्या हेमंत बळीराम गावंड (रा. आवरे), संदीप तुकाराम कोळी (रा. करंजा), रोशन भगवान कोळी (रा. करंजा), शंकर हिरा भोईर (रा. आपटा), कृष्णा राम भोईर (रा. आपटा) या पाच जणांवर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थीर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात सीएस कोर्सेसविषयी मार्गदर्शन सत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सोमवारी (दि.२८) वाणिज्य विभागातर्फे कंपनी सेक्रेटर (सी एस) कोर्स - एक करिअर पर्याय या विषयावर मार्गदर्शन सत्राचे आयोजन केले होते

या सत्रात संतोष भट्टाचार्यजी सेक्रेटरी, मॅनेजिंग कमिटी खारघर यांनी विद्यार्थ्यांना सी एस कोर्सचे महत्त्व, अभ्यासक्रमाची रूपरेषा, प्रवेश प्रक्रिया, भविष्यातील करिअर संधी आणि व्यावसायिक वाढीचे पैलू समजावून सांगण्यात आले तसेच त्यांनी सी एस कोर्सचे व्यावसायिक क्षेत्रातील योगदान आणि बदलत्या आर्थिक वातावरणात याची गरज यावर सविस्तर प्रकाश टाकला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या सत्रामध्ये सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

वाणिज्य विभागप्रमुख प्रा. विशाल देशमुख यांनी या सत्राचे आयोजन केल्याबद्दल समाधान व्यक्त केले आणि विद्यार्थ्यांनी अशा व्यावसायिक कोर्सविषयी जागरूक होऊन आपले करिअर घडवावे असे आवाहन केले. या सत्रास वाणिज्य शाखेतील अनेक विद्यार्थी उपस्थित होते.

दरम्यान, या महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी अनेक उपक्रम राबविण्यात येतात.



**अलिबाग : श्रावण महिन्यातील पहिल्या सोमवारी अलिबाग मधील आंग्रे कालीन काशीविश्वेश्वर मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती.**

# पनवेलमध्ये आरएमएची तिसरी झोनल वैद्यकीय परिषद

**कर्जत : प्रतिनिधी**

रायगड मेडिकल असोसिएशनची तिसरी झोनल वैद्यकीय परिषद पनवेल येथे पार पडली, रायगड व नजीकच्या परिसरातील अनेक मान्यवर डॉक्टरांचा उत्स्फूर्त सहभाग घेतला.

पनवेल खांदा येथे परिषदेचे आयोजन करण्यात आले होते, कार्यक्रमाची सुरुवात रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आशुतोष कुळकर्णी यांच्या प्रास्ताविक भाषणाने झाली. त्यांनी संघटनेच्या उपक्रमांविषयी आणि आगामी शैक्षणिक योजनांविषयी उपस्थितांना माहिती दिली.

त्यानंतर जिल्हा सचिव डॉ. प्रशांत गांगल यांनी उपस्थित सर्व मान्यवर डॉक्टरांचे स्वागत केले आणि कार्यक्रमाच्या हेतूची रूपरेषा मांडली. या झोनल मध्ये खास निमंत्रित वक्ते म्हणून खालील कर्करोग तज्ज्ञ डॉ. देवेंद्र पाल, डॉ. रजिउद्दीन ख्वाजा, डॉ. कस्तुरी बरुआ यांनी विविध कर्करोगांच्या निदान, उपचार व नवे संशोधन या विषयांवर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात माजी अध्यक्ष डॉ. प्रमोद गांधी, डॉ. रमेश पटेल, डॉ. अरुण भगत, तसेच कार्यकारिणी सदस्य डॉ. मिलिंद घरत, डॉ. अनिल पराडकर, डॉ. सतीश भोईर , डॉ. विशाल वाणी, डॉ सचिन आगलावे, खारघर डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अनिल भाळे, अध्यक्ष डॉ. शिरीष जोशी, डॉ. सौरभ फडके, डॉ. विनय शेलार, डॉ. निखिल भारंबे,, तसेच डॉ. देवेंद्र पाल, आणि डॉ. संजीव पाटील,डॉ. नागेश चित्ते,डॉ. बी . जी. लाड, डॉ. श्रीकांत डहाके,तसेच स्पोर्ट सचिव डॉ. निलेश म्हात्रे,आणि पनवेल व रायगड जिल्ह्यातील सर्व प्रमुख तज्ज्ञ डॉक्टर्सनी उपस्थित होते. खजिनदार डॉ. कुमार ओसवाल यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# वाहतूक पोलिसांचे मोबाईल हिसकावणारे दोघे गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल वाहतूक शाखा येथे नेमणूक असलेले हवालदार युवराज येळे व अमीर रसुल मुलाणी यांचा मोबाईल डिझेल चोरी करणाऱ्या अज्ञात व्यक्तींनी हिसकावून ते पसार झाले होते. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच गुन्हे शाखेच्या पथकाने दोन आरोपीना ताब्यात घेतले असून एक आरोपी फरार आहे त्याचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

पुष्पक नगर समोरील ब्रिजवर, पनवेलच्या दिशेने येणाऱ्या वाहिनीवर, जेएनपीटी रोडवर, कर्तव्य बजावत असताना पोहवा युवराज येळे व पोहवा अमीर रसुल मुलाणी हे जेएनपीटी रोडवर दोन्ही बाजुला अनधिकृतपणे उभ्या असलेल्या वाहनांवर कारवाई करित असताना यातील आरोपींपैकी एक आरोपी उभा असलेला मिक्सर वाहन (एमएच ४ एफबी २३३१) या वाहनातून डिझेल काढत असताना त्यांनी पाहिल्यानंतर त्यास हटकले असता नमुद आरोपी पळून जावुन मिक्सर वाहन शेजारीच उभी असलेली पांढऱ्या रंगाच्या कार मध्ये बसत असताना यातील या दोघांनी त्यास पकडले असता त्याने या दोघांच्या शासकीय कामात अडथळा निर्माण करुन त्या दोघांना धक्का देवुन खाली पाडुन त्याच्या ताब्यातील मोबाईल त्यांच्या संमतीशिवाय हातातून हिसकावुन जबरी चोरी करून नमुद पांढऱ्या रंगाच्या कारच्या चालक सिटवर बसलेला सह आरोपी सोबत पळुन गेले होते.

या बाबतचा तपास वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विनोद लबडे, पोहवा अविनाश गंथाडे, नितीन वाघमारे, महेंद्र वायकर, परेश म्हात्रे, योगेश दिवेकर, विनोद देशमुख, पोना सम्राट डाकी, पोशी चंद्रशेखर चौधरी आदींच्या पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपींचा शोध घेत असताना पोहवा परेश म्हात्रे याना आरोपी साहिल लाड (वय २३, रा. कर्जत) यांच्या बाबत माहिती मिळली असता आरोपीला सापळा रचून ताब्यात घेतले असता त्याने त्याचा सहकारी मुक्शशीर मुसव्वीर टोले, (वय २७, रा. घाटकोपर)याची माहिती दिली. या दोघांनी गुन्हा कबुल केला असून मुख्य सहकारी जय पंडित याचा शोध पोलीस उपनिरीक्षक विनोद लबडे करीत आहेत.

# श्रावणाच्या पहिल्या सोमवारी शिवभक्तांना अल्पोपहार

## आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनी येथील श्रीराम नागरी सहकारी पतसंस्थेच्या पहिल्या वर्धापनदिनानिमित्ताने पनवेलमधील जागृत देवस्थान असलेल्या खांदेश्वर मंदिरात तब्बल २०० किलो साबुदाणा खिचडी आणि ५०० डझन केळी असा उपवासाचा फराळ वाटप करण्यात आले. लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या फराळ वाटपाचा लाभ सोमवारी सकाळपासून हजारो शिवभक्तांनी घेतला.



श्री नागरी सहकारी पतसंस्था तुर्भे, नवी मुंबईचे अध्यक्ष रामदास पिंगळे, उपाध्यक्ष हनुमंत शेटे आणि खांदा कॉलनी शाखेचे मुख्य सल्लागार म्हणून ओंकारशेठ गावडे काम पहात आहेत. सेक्टर ७ खांदा कॉलनी येथे श्रीराम नागरी पतसंस्था कार्यान्वित आहे. हजारो ठेवीदारांच्या विश्वासावर पतसंस्थेची यशस्वीपणे वाटचाल सुरू आहे. पदाधिकाऱ्यांच्या संकल्पनेतून श्रावणाच्या पहिल्या सोमवारी आलेल्या पहिल्या वर्धापनदिनानिमित्ताने आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला.

सकाळी ८ वाजल्यापासून सुरू केलेले फराळ वाटप नियोजनबध्द पध्दतीने यशस्वी होण्यासाठी शाखा सल्लागार मांगिलाल चौधरी, अर्चना खंडागळे, शाखा व्यवस्थापक राकेश भैय्ये आंदीनी परिश्रम घेतले. फराळ वाटपाच्या कार्यक्रमाला माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील, भीमराव पोवार, महादेव वाघमारे, शिवसेनेचे शहरप्रमुख सदानंद शिर्के, पतसंस्थेचे पदाधिकारी, उपस्थित होते.

दरम्यान, या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी महादेव मंदिरात दर्शन घेतले.



# शिक्षकांसाठी आरोग्य शिबिर

**उरण : रामप्रहर वृत्त**

माधवबाग येथील मुख्य व्यवस्थापक डॉ. राहुल जाधव यांच्या कल्पकतेतून गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून पनवेल, उरण, खालापूर, कर्जत, या भागातील शिक्षकांच्या आरोग्याची तपासणी तसेच व्याख्यानाचे आयोजन माधवबाग येथे करण्यात आले होते. या शिबिरासाठी तुकाराम हरी वाजेकर विद्यालय फुंडे येथील प्राचार्य आदरणीय साळुंखे साहेब, जूनियर कॉलेज विभागाचे विभाग प्रमुख माने सर तसेच विद्यालयाचा स्टाफ विशेषतः महिला वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद या शिबिरामध्ये दिसून आला.

अतिशय खेळीमेळीच्या वातावरणामध्ये हा आरोग्य शिबिराचा कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण झाला या कार्यक्रमासाठी माधवबागचे काळजीवाहू रवी झिंगे यांनीदेखील फुंडे येथील स्टाफसाठी खूप चांगल्या पद्धतीने सहकार्य केले. सर्व स्टाफ अप्रतिमरित्या आमच्यावरती देखरेख ठेवून सर्व सेवा देण्याचा प्रयत्न करत होता. त्याबद्दल विद्यालयाच्या प्राचार्यांच्या वतीने डॉ.राहुल जाधव आणि माधवबागेतील सर्व स्टाफ चे मनःपूर्वक आभार मानले.



# पनवेल एसटी आगारात नवीन बसेस दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, परिवहन मंत्री प्रतापजी सरनाईक, परिवहन राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राची विकासाची घोडदौड सुरू आहे.

त्याचाच एक अध्याय म्हणून पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आमदार विक्रांत पाटील यांच्या पाठपुराव्याने सुरक्षित, सोयीस्कर आणि आधुनिक प्रवासाकरीत पनवेलला मिळाल्या नवीन बसेस. लोकांच्या सेवेसाठी वाहतुकीतली नवी पायरी प्रगतीच्या दिशेने आणखी एक पाऊल आज पडले. पनवेलला मिळाल्या अत्याधुनिक बसेस ज्यामध्ये आवश्यकता प्रवाशांसाठी सुख सोयी उपलब्ध आहेत.



पनवेल एसटी बस स्थानक येथे नवीन बसेसचे लोकार्पण पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी माजी नगरसेवक गणेश कडू, माजी नगरसेविका प्रीती जॉर्ज, माजी नगरसेविका सारिका भगत, परिवहन विभागीय वाहतूक अधिकारी अमित गिरमे, वाहतूक अधिकारी ज्ञानेश्वर म्हात्रे, पनवेल आगार व्यवस्थापक अश्विनी फाळके, संजय पाटील आणि आजारातील विभागीय कर्मचारी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

दरम्यान, या नवीन बसेसमुळे प्रवाश्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

**पनवेल बस आगारात नवीन बसेस दाखल झाल्या. त्याचा नागरिकांना भविष्यात उपभोग घेता येईल. पनवेल बस आगार नव्याने निर्मितीसाठी काही त्रुटी निर्माण झाल्यामुळे काम थांबले आहे. संबंधित विभागाशी योग्य तो पाठपुरावा करून लवकरच प्रवाशांना आगारामध्ये मिळणाऱ्या सुख सुविधा त्यांना उपभोगता येतील यासाठी आम्ही पाठपुरावा घेणार आहोत.**

**–प्रितम म्हात्रे, माजी विरोधी पक्षनेते, पनवेल महापालिका**

# एमएनएम विद्यालयात आंतर शालेय चित्रकला स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे (एमएनएम) विद्यालय व तुकाराम नारायण भरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्समध्ये संस्थेचे चेअरमन माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या अमृता महोत्सवी पदार्पण वर्षाबद्दल पूर्व प्राथमिक विभागामार्फत आंतरशालेय चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेमध्ये जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या विविध शाळा तसेच रयत शिक्षण संस्थेच्या शाळेतील छोट्या चिमुकल्या पूर्व प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धेमध्ये उत्साहाने सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ सायली वडवलकर यांनी दीप प्रज्वलनाने केले. चित्रकला स्पर्धेचे परीक्षण जी.जी. भोईर छत्रपती शिवाजी विद्यालय गव्हाण, सौ देवयानी मोकल यांनी केले.

शाळेच्या माध्यमिक उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, पूर्व प्राथमिक विभागाच्या वैशाली जोशी, सुप्रिया रोकडे यांनी विशेष प्रयत्न करत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.





**पनवेल : श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे पोदी येथील पनवेल महापालिकेच्या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले शाळा याठिकाणी माजी नगरसेवक ॲड. मनोज कृष्णाजी भुजबळ यांच्या हस्ते रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांस कडून शाळेतील विद्यार्थ्यांसाठी वह्या वाटप करण्यात आले. या वेळी शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता पगारे आणि शिक्षक वृंद तसेच किशोर शिंदे उपस्थित होते.**

# श्रावणी सोमवारनिमित्त शिवकावड यात्रा उत्साहात

**पनवेल, मोहोपाडा : प्रतिनिधी**

अखिल आर्यवत संघ आंतरराष्ट्रीय बजरंग दल रायगड विभाग पनवेल विधानसभा तर्फे खांदेश्वर शिवमंदिर ते गाढेश्वर शिव मंदिर अशी 'शिवकावड यात्रा' आयोजित करण्यात आली होती. या शिवकावड यात्रेच्या शुभारंभ प्रसंगी लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून भगवान शिव शंकरांचे दर्शन घेतले व सर्वांना कावड यात्रेसाठी शुभेच्छा दिल्या.

दरम्यान या कार्यक्रमाला आचार्य महामंडलेश्वर योगी सिद्धनाथ आघोर हेदेखील उपस्थित होते. तसेच आयोजक अखिल आर्यवत संघ आंतरराष्ट्रीय बजरंग दलचे पदाधिकारी उपस्थित होते.



या यात्रेत शेकडो शिवभक्तांनी खांद्यावर शिव कावड घेतली होती. तर सर्वांनीच भगवे वस्त्र परिधान केले होते. दुपारी चार वाजता शिव कावड यात्रा गाढेश्वर शिव मंदिर येथे पोहताच शिवभक्तांनी भगवान शिवाचा जयघोष केला. या शिव कावड यात्रेत आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिनेश पाटील, बजरंग दलाचे महामंत्री व शिव कावड यात्रेचे संस्थापक अध्यक्ष सचिन खुळे, आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे मावळ लोकसभा प्रसिध्दीप्रमुख राकेश खराडे, महामंत्री रायगड जिल्हा वैभव कशेळीकर, जिल्हाध्यक्ष नामदेव भोईर, गोरक्षा अध्यक्ष मलेश गुडसे,दलाचे उरण विधानसभा अध्यक्ष जनार्दन मालुसरे, खालापूर तालुका अध्यक्ष प्रशांत तांबोळी, मातृ शक्ती परिषदेच्या जिल्हा कोषाध्यक्षा भक्तीताई भावल, मातृशक्ती परिषदेच्या पनवेल तालुका अध्यक्षा उषा गुप्ता, चंद्रकांत पाटील यांच्यासह आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे पदाधिकारी व शेकडो सदस्य शिव कावड यात्रेत सामील झाले होते.

# कमळ महिला पतपेढीचा १२ टक्के लाभांश जाहीर

## संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी पनवेल या संस्थेने सभासदांसाठी १२ टक्के लाभांश जाहीर केला. शनिवार दिनांक १९ जूलै २०२५ रोजी 'ज्येष्ठ नागरिक सभागृह' पनवेल येथे कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेची २० वी वार्षिक सर्वसाधारण सभा झाली.



त्यावेळी सदर लाभांश जाहीर करण्यात आला. राष्ट्रगीताने सभेस सुरूवात करण्यात आली. त्यानंतर सभेच्या सुरवातीला संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती मालती आंग्रे त्यांच्या वैयक्तिक कारणास्तव हजर राहू न शकल्याने त्यांच्या जागी संस्थेच्या संचालिका पूनम सचिन बांदोडकर यांनी सभेचे अध्यक्ष पद भुषविले. आणि अध्यक्षांचे मनोगत वाचून दाखविले.

सभेच्या सुरवातीला संस्थेचे संस्थापक आणि तज्ञ संचालक शशिकांत बांदोडकर यांनी आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये मृत पावलेल्या सभासद, ठेवीदार व हितचिंतक तसेच पहलगाम येथील हल्ल्यात मृत पावलेले भारतीय नागरीक, भारत पाकिस्तान युध्दात शहीद झालेले जवान तसेच विमान अपघातात मयत झालेले नागरीक यांना संस्थेतर्फे श्रद्धांजली वाहिली.

त्यानंतर संस्थेचे संस्थापक आणि तज्ञ संचालक शशिकांत बांदोडकर यांनी संस्थेच्या सन २०२४-२५ चा आर्थिक आढावा घेऊन संस्थेच्या झालेल्या प्रगतीचा आलेख सभासदांसमोर सादर केला. संस्थेस एकूण मिळालेले उत्पन्न आठ कोटी ९६ लाख १४ हजार रुपये तसेच सभासदांच्या ठेवीवर दिलेले व्याज आणि व्यवस्थापन खर्च आणि काही तरतुदी करून सात कोटी ४५ लाख खर्च जाऊन संस्थेला एक कोटी ५१ लाखाचा निव्वळ नफा संस्थेला झाल्याचे सांगितले. तसेच संस्थेचा नेट एन.पी.ए. शुन्य टक्के असल्याचे सांगितले. त्यामुळे संस्थेची आर्थिक प्रगती पहाता सभासदांना सन २०२४-२५ चा १२ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला.

नफा तोटा व ताळेबंद पत्रकावर चर्चा करून, तसेच झालेल्या नफा विभागणीस उपस्थित सभासदांनी मान्यता दिली. तसेच उपविधी दुरूस्तीस, सभासदांच्या भागभांडवल वाढीस मंजुरी, कर्मचाऱ्यांच्या झालेल्या पगारवाढीस वार्षिक सभेची मान्यता घेण्यात आली.

सभेतील सर्व विषय संपल्यानंतर संस्थेच्या सभासदांच्या पाल्यांचा, इयत्ता १० वी आणि १२ वी परिक्षेत उत्तमरित्या उत्तीर्ण झालेल्यांना स्मृतीचिन्ह आणि भेट वस्तू देऊन सन्मान करण्यात आला. सभेला फार मोठ्या संख्येने महिला पुरुष सभासद उपस्थित होते.

या वेळी संस्थेच्या उपाध्यक्षा पूर्वा खेडेकर, संचालिका श्रीमती चित्रा मानकामे, उर्मिला वंजारी, मनिषा विसपूते, सुषमा जांभळे, अर्चना कुळकर्णी, निर्मला म्हात्रे, अर्चना गायकवाड, नव्याने निवड झालेल्या संचालिका वृंदा बाबरे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष ठोंबरे उपस्थित होते. संस्थेच्या उपाध्यक्षा पूर्वा खेडेकर यांनी अतिशय सुंदर आणि प्रभावीपणे सूत्र संचालन केले. शेवटी स्नेह भोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

संचालक मंडळ आणि अधिकारी, कर्मचारी यांच्या नियोजनामुळे व बांदोडकर साहेब यांच्या मार्गदर्शनामुळे संस्थेची तिसावी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात शिस्तबद्ध पद्धतीने झाली.

# वर्ग प्रतिनिधी निवडणूक

**कळंबोली : बातमीदार**

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक ज्ञान मंदिरामध्ये विद्यालयात दरवर्षी वर्ग प्रतिनिधी निवडणुका घेतल्या जातात, मात्र यावर्षी प्रथमच ईव्हीएम मशीनचा वापर करून निवडणुका घेण्यात आल्या.

इयत्ता दहावीचा विद्यार्थी ओम मत कर यांच्या टीमने ईव्हीएम मशीन बनवलेले होते. त्यासाठी त्याला विज्ञान व गणित विषयाच्या शिक्षिका वाघ मॅडम व गावडे मॅडम यांनी ईव्हीएम मशीन तयार मार्गदर्शन केले होते.

शाळेतील विद्यार्थ्यांमधून निवडणूक आयोगाची स्थापना करून प्रांजल यादव हिची निवडणूक आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात आली. यामध्ये एकूण १६ विद्यार्थ्यांनी निवडणूक विभागाचे काम केले व निवडणुका पार पडल्या व निकाल ही त्या दिवशी देण्यात आला.

यासाठी विद्यार्थांना निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी विद्यालयातील शिक्षक उध्दव कदम यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले. उपक्रम राबविण्यासाठी मुख्याध्यापिका संजना बाईत यांनी मोलाचे सहकार्य केले.

# नाच गं घुमा पनवेलतर्फे मंगळागौरीचा जल्लोषात कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्रावण महिन्याच्या स्वागतासाठी नाच गं घुमा पनवेल या महिलावर्गीय सांस्कृतिक मंडळातर्फे एक आगळावेगळा मंगळागौरीचा कार्यक्रम पनवेलमधील दास मारुती मंदिर येथे उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात पनवेलमधील विविध महिलामंडळांना आमंत्रित करून पारंपरिक खेळ, उखाणे, प्रश्नमंजुषा, आणि सांस्कृतिक स्पर्धांद्वारे श्रावण साजरा करण्यात आला. सततच्या पावसाचं आव्हान झुगारून महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विशेष म्हणजे, एक घरकाम करणाऱ्या महिलेला प्रमुख पाहुण्या म्हणून आमंत्रित करून तिच्या हस्ते आरती करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. ही स्तुत्य कल्पना उपस्थितांनी विशेषत्वाने गौरवली.

कार्यक्रमामध्ये फुगड्या, झिम्मा, किकींचं पान, दिंड्या यांसारखे पारंपरिक खेळ खेळण्यात आले. यावेळी दीपक साडी स्टोअर प्रायोजित उखाणे स्पर्धा आणि वेदा आर्ट प्रायोजित प्रश्नमंजुषा स्पर्धा यामध्ये महिलांनी मोठ्या संख्येने भाग घेतला.विजेत्यांना साड्या, नथ यांसारखी आकर्षक बक्षिसे देण्यात आली. तसेच, विशेष आकर्षण ठरली ती श्रावण क्वीन स्पर्धा, ज्यात वेशभूषा, खेळातील सहभाग व उत्साहावरून तीन महिलांना गौरवण्यात आले. सर्व उपस्थित महिलांना अंकित ज्वेलर्स तर्फे एक खास भेटवस्तू देण्यात आली. कार्यक्रमाच्या सांगतेस स्वादिष्ट अल्पोपहाराने महिलांनी मनमुराद आनंद लुटला.

नाच गं घुमा ग्रुपच्या सख्यांनी उत्तम आयोजन करत पनवेल परिसरातील महिलांना श्रावणाचा उत्सवप्रसंग मोठ्या आनंदात साजरा करण्याची संधी दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दास मारुती मंदिर ट्रस्ट, प्रायोजक संस्था आणि सहभागी महिलामंडळांचे विशेष आभार मानण्यात आले. संस्कृती जपत पुढे जाण्याचा निर्धार करत, नाच गं घुमा पनवेल ग्रुपकडून अशाच अनेक उपक्रमांची घोषणा लवकरच होणार आहे.



## संपादकीय

# युद्धसज्ज नवा भारत

**ऑपरेशन सिंदूरने आधुनिक काळातील लष्करी संघर्ष कसा असेल हे स्पष्ट करण्याबरोबरच भारत नव्या युद्धतंत्रासाठी सज्ज असल्याचेही जगाला दाखवून दिले होते. भारतीय सैन्य परिवर्तनशील, आधुनिक आणि भविष्यातील प्रभावी शक्ती म्हणून वेगाने सज्ज होत आहे.**

कारगिल विजय दिनानिमित्त लडाखमधील द्रास येथे बोलताना भारतीय लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी भारतीय सैन्याचा भविष्यातील आराखडा सांगितला व ऑपरेशन सिंदूर राबवून भारताने दहशतवाद्यांचा पराभव केल्याचेही अधोरेखित केले. पहलगाम दहशतवादी हल्ल्याला भारताने दिलेले प्रत्युत्तर म्हणजे ऑपरेशन सिंदूर होते. भविष्यातील युद्धे ही तंत्रज्ञानाच्या साह्याने दिलेले अचूक व वेगवान प्रत्युत्तर अशा स्वरुपाचीच असणार आहेत. ऑपरेशन सिंदूरमधून भारतही आधुनिक युद्धतंत्रसज्ज असल्याचे जगभराला दिसून आले. या ऑपरेशनमधून निर्णायक वेळेत नेमके उत्तर देण्याची भारताची क्षमता अधोरेखित झाली. पूर्ण गोपनियता पाळून अतिशय अचुकतेने आणि वेगवान रीतीने ऑपरेशन सिंदूर पार पडले. चीनने यावेळी पाकिस्तानला शस्त्रास्त्रे पुरवली. पाकिस्तानने तुर्की बनावटीचे ड्रोनही वापरले. परंतु भारतीय हवाई संरक्षण प्रणालीने त्यांना अचूकपणे रोखले. आता यादृष्टीने देशाला अधिक सुसज्ज करण्यासाठी केंद्र सरकारने आणि लष्कराने काही नवीन उपाययोजना केल्या आहेत. शनिवारी कारगिल विजय दिवसाच्या निमित्ताने लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी 'रुद्र' या नवीन ऑल आर्म्स ब्रिगेडची घोषणा केली. भविष्यातील गरजांनुसार लष्कर आणखी सुसज्ज आणि सक्षम होण्यासाठी या ब्रिगेड्सची स्थापना करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. लष्कर हे भविष्यातील आव्हानांचा सामना करण्यासाठी वेगाने विकसित होत आहे. त्यासाठी या एकत्रित ब्रिगेड्स आणि विशेष दलांना अधिक सक्षम करण्यात येत आहे. आजचे भारतीय सैन्य परिवर्तनशील, आधुनिक आणि भविष्यातील मजबूत शक्ती म्हणून वेगाने पुढे जात आहे. रुद्र ब्रिगेडमध्ये पायदळ (इन्फंट्री), यांत्रिक पायदळ (मेकॅनाइज्ड इन्फंट्री), बख्तरबंद तुकड्या (आर्मर्ड युनिट्स), तोफखाना (आर्टिलरी), विशेष कमांडो दल (स्पेशल फोर्सेस) आणि मानवरहित हवाई प्रणाली (ड्रोन युनिट्स) यांचा समावेश असेल. या सर्व घटकांना त्यांच्या गरजेनुसार एकत्रितरित्या लढाऊ साह्य पुरवले जाईल. रुद्र सोबतच सीमारेषेवर शत्रूला अचानक घेरणाऱ्या चपळ आणि सर्वात घातक अशा विशेष दलांच्या 'भैरव' लाइट कमांडो बटालियनची स्थापनाही करण्यात आली आहे. या बटालियन ड्रोन, एआय आधारित प्रणाली आदी आधुनिक तंत्रज्ञानाने पूर्णपणे सुसज्ज असतील. प्रत्येक पायदळ बटालियनमध्येही आता ड्रोन प्लॅटून्स असतील. नुकतीच भारताने अचूक लक्ष्यभेद करणाऱ्या क्षेपणास्त्रवाहू ड्रोनची यशस्वी चाचणी देखील केली. डीआरडीओ अर्थात संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेला ड्रोनद्वारे मिसाइलचा मारा करून लक्ष्याचा भेद करण्यात यश आले. डीआरडीओने आंध्र प्रदेशातील कुर्नूलमध्ये ही यशस्वी चाचणी केली. यामुळे देशाच्या मिसाइल क्षमता विकास कार्यक्रमाला मोठी चालना मिळाली आहे. भारताची युद्ध तंत्रज्ञानाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याकडे सुयोग्य वाटचाल सुरू आहे. युद्ध आता सीमारेषेपुरते मर्यादित राहिलेले नाही हे ऑपरेशन सिंदूरमधून स्पष्ट झालेच आहे. त्यामुळे सैन्याच्या आधुनिकीकरणामध्ये ड्रोन आणि लढाऊ विमानांचा समावेश अत्यावश्यकच आहे. भारत आता शस्त्रास्त्रांचे संशोधन व उत्पादन करतानाच निर्यातदार म्हणूनही पुढे येतो आहे. लक्ष्य ठरविणे आणि नेमक्या ठिकाणी मारा करणे हा अत्याधुनिक युद्धतंत्रज्ञानाचा अविभाज्य भाग आहे. भारतीय लष्कर हेच लक्षात घेऊन नेमकेपणाने सज्ज होत आहे.

# पाचाड येथील जिजामाता वाड्याचे अवशेष मोजताहेत अखेरच्या घटका

**खबरबात**
**महेश शिंदे**



राजमाता जिजाऊ माँसाहेबांचा पाचाड येथील असलेल्या राजवाड्याचे अवशेष आता अखेरच्या घटका मोजत आहे. भारतीय पुरातत्त्व विभागाच्या ताब्यात असलेले हे ऐतिहासिक संरक्षित स्थळ शासन लोकप्रतिनिधी आणि पुरातत्व विभागाच्या दुर्लक्षामुळे दुर्लक्षित होत आहे.

किल्ले रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड येथे राजमाता जिजाऊ माँसाहेबांचा राजवाडा होता. या ठिकाणी छत्रपती शिवरायांच्या मातोश्री जिजामाता वास्तव्यास होत्या. त्यामुळे या राजवाड्याला देखील अनमोल असे महत्त्व आहे. किल्ले रायगड पाहावयास येणारा प्रत्येक शिवभक्त पाचाड येथील राजवाड्याला आणि राजमाता जिजाऊंच्या समाधी स्थळाला भेट देऊन नतमस्तक झाल्याशिवाय परतत नाही. शेकडो वर्षानंतर देखील या वाड्याचे अवशेष कायम असले तरी गेली काही वर्षांमध्ये या राजवाड्याच्या अवशेषांच्या संवर्धनाकडे दुर्लक्ष होत आहे. भारतीय पुरातत्व विभागाच्या ताब्यात असलेल्या या राजवाड्याची देखभाल दुरुस्ती गेली कित्येक वर्षात झालेली नाही. खरंतर एकीकडे शासनाने रायगड प्राधिकरणाच्या माध्यमातून करोड रुपये परिसरातील रस्ते किल्ल्याच्या परिसरातील ऐतिहासिक वास्तू आणि उत्खननावर खर्च केलेले असताना या राजवाड्याच्या उभारणीकडे मात्र दुर्लक्ष केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहेत. काही वर्षांपूर्वी याच राजवाड्याच्या शेजारी रायगड महोत्सवाच्या नावाखाली करोड रुपये खर्च करण्यात आले होते. तात्पुरत्या स्वरूपामध्ये या राजवाड्यावर आणि किल्ले रायगडावर आकर्षक वीज व्यवस्था करण्यात आली होती. मात्र त्यानंतर या राजवाड्याच्या संरक्षक भिंती आणि आतील वाड्यांच्या जोत्यावर उगवलेले गवत काढायला देखील वेळ नसल्याचे दिसून येत आहे.

राजवाड्याच्या संरक्षक भिंती पाचाड येथील पावसामध्ये सातत्याने कोसळत चालल्या आहेत. या राजवाडा परिसरामध्ये उगवणारे गवत, भिंतीवर वाढलेली रोपटी आजही जशीच्या तशीच आहे. राजवाड्याच्या आतील परिसरामध्ये असलेल्या विहिरी त्याचप्रमाणे घरांचा पाया दिवसेंदिवस ढासळू लागले आहेत. रायगड प्राधिकरणाच्या माध्यमातून मुख्य रस्ता ते राजवाड्याचे प्रवेशद्वार इथपर्यंत जाण्यासाठी फक्त पायऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र आतील बाजूस असलेल्या वास्तूंना पुन्हा उभे करण्याबाबत कोणतेच नियोजन अद्याप झालेले नाही. या राजवाड्याच्या प्रवेशद्वारावर असलेला लोखंडी दरवाजा देखील तात्पुरत्या स्वरूपाचा असून तो देखील कापडी चिंधीने बांधला आहे. राजवाड्याच्या परिसरामध्ये असलेल्या वास्तू नेमक्या कशा संदर्भात आहेत याबाबत कोणत्याच प्रकारचे मार्गदर्शक फलक लावण्यात आलेले नाहीत. मुख्य रस्त्यावर लावण्यात आलेला फलक देखील जिजामाता वाडा असा एकेरी स्वरूपात लावण्यात आलेला आहे. याबाबत शिवप्रेमी मध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या ठिकाणी करोडो रुपयांची तरतूद करून शिवसृष्टी उभी करण्यासाठी करोडो रुपये मोजून भूसंपादन करण्यात आले आहे. हे भूसंपादन करताना देखील स्थानिक शेतकऱ्यांना डावलून या धना दांडग्यांनी जमिनी खरेदी केल्या होत्या त्यांना अधिक पैसे मोजून हे संपादन करण्यात आले आहे. असे असताना हेच करोडो रुपये या राजवाड्याच्या पुनर्वऊभारणीसाठी खर्च केले असते तर आज हा वैभवशाली राजवाडा भावी पिढीसाठी प्रेरणादायी ठरला असता.

राजवाड्याप्रमाणेच राजमाता जिजाऊंच्या समाधी स्थळावर देखील अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. नुकत्याच झालेल्या पुण्यतिथी कार्यक्रमादरम्यान या समाधीस्थळाचा ताबा नक्की कोणाकडे आहे असा जाब स्थानिक नागरिकांनी उपस्थित केला होता. या ठिकाणी सुरू असलेले काम अर्धवट अवस्थेत पडलेले असून बांधण्यात आलेले शौचालय देखील बंद ठेवण्यात आलेले आहे. यामुळे शासन ऐतिहासिक वास्तू जतन करण्यास का दुर्लक्ष करते असा प्रश्न शिवप्रेमी आणि पर्यटकांमधून विचारला जात आहे.

आज किल्ले रायगडावर आलो असता राजमाता जिजाऊ यांच्या राजवाड्याला भेट दिली असता दुःख झाले. प्रवेशद्वारावरील तुटक लोखंडी गेट आणि कुठेही नामफलक नाही. सगळीकडे गवत आणि रोपटी उगवलेली आहेत. नक्की पुरातत्व विभाग संवर्धन कशाचे करतं असा प्रश्न पडला आहे.

# चौलच्या महात्मा डोंगरातील प्राचीन वाघदेवी मंदिर



चौल दक्षिण भागात चौल भोवाळे ते वावे मुख्यः रस्त्यावरील हिंगुळजादेवी मंदिराचे समोरील चौल कातळपाडा गावाहून पुढे भिसारी तळयास वळसा घालून महात्माच्या डोंगराकडे जाण्याचा मार्ग आहे. डोंगराला महात्माचे डोंगर का म्हटले जाते याचे कारण कुठेही लिखित सापडत नाही मात्र प्राचीन काळी तपस्वीची तपोभूमी असल्यानेच या डोंगरास महात्माच्या डोंगर असे म्हटले जात असावे असा कयास येथील ग्रामस्थ करतात.

डोंगर माथ्याकडे जाण्यासाठी भिसारी तळयाजवळून पायरस्ता आहे. अर्धा कि.मी. डोगराचा पायवाटेचा रस्ता संपल्यावर डोगराचा विर्स्तीर्ण भाग सुरू होतो. डोगरात छोटयाश्या पायवाटेने मार्गक्रमण करत वाघदेवी मंदिराकडे जाण्याचा रस्ता सुरू होतो. महात्मा डोगरात वाघदेवीच्या मंदिराकडे जात असताना सुरूवातीला भाविकांचे श्रध्दा व भक्ती असलेले नागदेवतेचे स्थान आहे.प्रतिवर्षी भाविक या स्थानाची स्वच्छता करून झाडे झुडपे हटवितात. या स्थानाला नागकडा असे म्हटले जाते. दरवर्षी या नागकडावरील नागदेवतेचे दर्शन भाविक घेवूनच पुढे महात्माच्या डोगरातील वाघदेवीच्या दर्शनासाठी जात असतात.

नागपंचमीच्या दिवशी भाविकांची मोठी गर्दी येथे नागदेवतेच्या दर्शनासाठी होते. काही अंतरावर पाषाणाच्या पादुका कोरलेल्या तीन चौकोनी शिला आढळतात. या शिलावर श्री राम असे कोरलेले आहे, येथूनच डोगरमाथ्याकडे वसलेल्या वाधदेवी मंदिराकडे जाण्याचा मार्ग आहे अखंड पाषाणात कोरीव काम असलेले श्री वाघदेवी मंदिर पहावयास मिळते. या पाषाणरूपी गृहेत प्रवेश केल्यावर प्रारंभी पाषाणाचा सभामंडप पहावयास मिळतो या पाषाणरूपी सभामंडपाच्या बाजूला पाषाणाची एक मीटर रूंद व एक मीटर लांब व आठ फुट खोलीची विहीर आहे.

डोगरमाथ्यावर पाषाणामध्ये सुध्दा या विहीरीला कायमचे पाणी आढळते. डोगरमाथ्यावर असून सुध्दा या विहीरीला आढळणारे पाणी एक आश्चर्य समजले जाते. पुढे गाभार्यात श्री वाघदेवीची तसेच महालक्ष्मीची मुर्ती पहावयास मिळते.

**–महेंद्र खैरे, रेवदंडा**



## बदलते तंत्रज्ञान

# चॅटजीपीटी सेवा पुन्हा सुरू झाल्या

चॅटजीपीटीच्या सेवा बंद झाल्याने युझर्सना लॉग इन करण्यात आणि सोरासारख्या सेवांमध्ये प्रवेश करण्यात समस्या येत होत्या आता




चॅटजीपीटीच्या सेवा पुन्हा सुरू झाल्या आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित चॅटबॉटच्या सेवा जगभरात बंद होत्या. तथापि, ओपन एआयने त्वरित समस्या सोडवली आणि त्याबद्दल माहिती दिली. या जागतिक आउटेजमध्ये, वापरकर्त्यांना लॉग इन करण्यात तसेच त्याच्या एआय टूल्स सोरा, कोडेक्स आणि जीपीटी एपीआयमध्ये प्रवेश करण्यात समस्या येत होत्या आणि स्क्रीनवर 'अनयूजुअल ॲक्टिव्हिटी डिटेक्टेड' असा संदेश झळकत होता.

९१% युझर्सनी सकाळी ७ ते ९ च्या दरम्यान समस्यांचा सामना केला ओकलाच्या वापरकर्ता अहवाल आणि समस्या निर्देशक 'डाउनडिटेक्टर' वर, सकाळी ७ ते ९ दरम्यान, ९१% लोकांनी चॅट जीपीटीमध्ये, ६% लोकांनी ॲप्समध्ये आणि ३% लोकांनी वेबसाइटमध्ये समस्या नोंदवल्या.

या समस्येमुळे अनेक वापरकर्त्यांना असे वाटले की त्यांचे अकाउंट हॅक झाले आहेत. अनेकांना वाटले की ChatGPT चा सर्व्हर डाउन आहे तर काहींना वाटले की तो डाउन आहे. अनेकांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म द आणि Reddit वर याची तक्रार केली.

यापूर्वी १० जून रोजी चॅट जीपीटी बंद होते. चार महिन्यांपूर्वीही घिबली इमेज जनरेटरच्या अतिवापरामुळे ते बंद होते. भारतात ते सुमारे दीड तास बंद होते.

२०२२ मध्ये चॅटजीपीटीचे सार्वजनिक अनावरण करण्यात आले. नोव्हेंबर २०२२ मध्ये ओपनएआयने चॅटजीपीटी जगासमोर आणले. या एआय टूलला वेगाने लोकप्रियता मिळाली आहे. संगीत आणि कविता लिहिण्यापासून ते निबंध लिहिण्यापर्यंत, चॅटजीपीटी बरेच काही करू शकते. हे एक संभाषणात्मक एआय आहे. एक कृत्रिम बुद्धिमत्ता जी तुम्हाला माणसांप्रमाणे उत्तर देते.

मायक्रोसॉफ्टसारख्या मोठ्या टेक कंपन्यांनी ओपनएआयमध्ये १३ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त गुंतवणूक केली आहे. कंपनीने त्यांच्या सर्च इंजिन 'बिंग' मध्ये चॅटजीपीटी देखील समाविष्ट केले आहे. अनेक कंपन्या चॅटजीपीटी वापरण्यास उत्सुक आहेत. अशा परिस्थितीत, येत्या काळात या एआय–आधारित चॅटबॉटचा वापर आणखी वाढण्याची अपेक्षा आहे

# बॉलीवूड अभिनेता संजय दत्त

**निमित्त**



संजय दत्त हा एक भारतीय अभिनेता आहे. त्याने बालपणात १९७२मध्ये आपल्या वडिलांसोबत रेशमा और शेरा या चित्रपटातून आपल्या अभिनयाची छबी उमटवली आहे. संजय दत्त एक यशस्वी अभिनेता, प्रसिद्ध चित्रपट अभिनेत्री नरगिस व अभिनेता संसदपटू सुनील दत्त यांचा मुलगा, खासदार प्रिया दत्तचा भाऊ आहे. वडिलोपार्जित मिळालेली प्रसिद्धी व धनदौलत मिळाल्यानंतरही हा नायक शेवटी खलनायक बनून चाहत्यांचे मनोरंजन करत राहिला. त्याच्याविषयी माहिती पाहूया.

संजय दत्त याचा जन्म २९ जुलै १९५९ या दिवशी झाला. त्याचे पूर्ण नाव संजय बलराज दत्त आहे. त्याचे वडील सुप्रसिद्ध अभिनेते आणि दिग्दर्शक सुनील दत्त तसेच त्यांची आई लोकप्रिय अभिनेत्री नर्गिस आहेत. १९८१मध्ये रॉकी या चित्रपटाच्या प्रीमियरच्या आधी त्याच्या आईचे निधन झाले. त्याला दोन बहिणी आहेत. प्रिया दत्त आणि नम्रता दत्त. त्याची बहीण प्रिया दत्त ही राजकारणी आहे. संजूला त्याच्या आईच्या मृत्यूने खूप मोठा धक्का बसला होता. जेव्हा आईचा मृत्यू झाला, तेव्हा संजू २२ वर्षाचा होता आणि या दुर्घटनेनंतर संजूला ड्रग्स आणि व्यसनाधीनतेचे व्यसन लागले. संजय दत्तने बऱ्याच चित्रपटांमध्ये काम केले. प्रेम आणि विनोदी शैलीत तर त्याने यश मिळवून घेतले.

संजय दत्त याने पहिले लग्न १९८७मध्ये रिचा शर्मा सोबत केले, मात्र लग्नाच्या नऊ वर्षानंतर रिचा शर्मा यांचे ब्रेन ट्यूमरमुळे १९९६मध्ये निधन झाले. मात्र यांच्या दोघांची एक मुलगी आहे. त्रिशला ही सध्या तिच्या आजी–आजोबांकडे अमेरिकेमध्ये राहते. संजय दत्त याने १९९८ साली मोडेल रिया पिल्लई दुसरे लग्न केले, परंतु काही कारणांमुळे त्याचे नातलग यशस्वी झाले नाही आणि दोघांचेही घटस्फोट झाले. यानंतर संजय दत्त व मान्यता हे भेटले. दोघेही दोन वर्ष एकत्र राहिले. त्यानंतर दोघांनीही गाठ बांधण्याचे ठरवले आणि गोव्यात जाऊन लग्न केले. २१ ऑक्टोबर २०१० रोजी मान्यता दत्तने इक्रा आणि शहारन या जुळ्या मुलांना जन्म दिला.

संजय दत्त याने आयुष्यात अनेक चढ उतार पाहिले. त्याचा अभिनेता म्हणून सुरुवात चांगलीच गाजली, परंतु अमली पदार्थांच्या आहारी गेले व अनेक वर्षे चित्रपट सृष्टीपासून दूर होते. अमली पदार्थांचे सेवन केल्याने त्यांची तब्येत एकेकाळी फारच खालावली होती. त्या वेळेस सुनील दत्त यांनी त्याला अमेरिकेत उपचारांसाठी नेले. अमली पदार्थांचे संजय दत्त याचे व्यसन उपचारानंतर सुटले व त्याने काही काळ अमेरिकेत व्यतीत केला. या काळात त्याला अमेरिकेतच रहाण्याची व चित्रपटसृष्टीतील प्रसिद्धीपासून दूर रहाण्याचे ठरवले होते, परंतु सुनील दत्त यांनी आपल्या इच्छेखातर भारतात परतण्याची विनंती केली व त्यास संजय दत्त याने होकार दिला.

भारतात परतल्यानंतर काही काळानंतर पुन्हा चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. अनेक हिट चित्रपट दिले. या काळात वैयक्तिक आयुष्यात बदल झाले तसेच १९९२च्या दंगली व नंतर झालेल्या बॉम्बस्फोटात त्याचे नाव होते. त्याच्या रहात्या घरातून बेकायदेशीर एके ५६ रायफल हस्तगत करण्यात आली. **(साभार : मराठी मोल)**


## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# पावसाळ्यामध्ये काय खाल-प्याल?

पावसाळ्याचा बेत म्हटलं की, गरमागरम वडे, भजी असेच चित्र डोळ्यासमोर येते, पण अनेकदा या भजी आणि वड्यांवर ताव मारलयानंतर पोटाच्या तक्रारी सुरू होतात. अशा वेळेस पावसाळ्यात काय खावे आणि काय टाळावे हे आधीच ठावूक करून घेणे शरीरासाठी फायदेशीर ठरते.



**कोबी, फ्लॉवर टाळा** : पावसाळ्यात शक्यतो काकडी, मुळा, भेंडी, तोंडली, गाजर, बीट यांचे आहारातील प्रमाण वाढवावे. शक्यतो कांद्याची पात, फ्लॉवर, कोबी यासारख्या भाज्या कमी खाव्यात. यातील पाण्याचे प्रमाण संसर्गजन्य रोगांचे प्रमाण सोबत घेऊन येते.

**तळलेले पदार्थ, सूप आणि भाजी** : पावसाळा आणि मक्याचे कणीस, भजी यांचे वेगळे नाते जनमानसात रुजलेले आहे. एखाद्या दिवशी तळलेल्या पदार्थांचा बेत असेल तर मुळात प्रमाणात खाणं आणि पुढच्या जेवणात भाज्यांचे सूप किंवा भरपूर भाजी असणारा आहार घेणे महत्त्वाचे आहे.

**हळद** : पावसाळ्यात रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी हळदीचे दूध पिणे उत्तम. शक्यतो रात्री झोपताना हळद–दूध प्यायल्यास उत्तम झोप लागू शकते. ज्यांना हॉर्मोनल/शारीरिक ग्रंथींचे विकार आहेत त्यांनी रात्री झोपताना गरम पाण्यातून एक चिमूट हळद एकत्र करून हे पाणी नक्की प्यावे.

**मसाला चहा** : भारतीय मसाल्यांचे– त्यातील योग्य मसाल्याच्या पदार्थांचे योग्य प्रमाणात मिश्रण चहासोबत एकत्र करून आपला नेहमीच चहा आणखी आरोग्यदायी ठरू शकतो. विशेषतः त्यात साखरेचे प्रमाण शून्य ठेवणे केव्हाही उत्तम.

**लसूण** : हिरव्या लसूणपातीचा पराठा, मिरची–लसूण ठेचा, लसूण चटणी यांना भारतीय आहारात महत्वाचे स्थान आहे. पावसाळ्यात विशेषतः तळलेले किंवा मसालेदार पदार्थ खाण्याची इच्छा असल्यास आहारात लसूण जरूर समाविष्ट करावी. शरीरातील चयापचय क्रिया वाढविणारे आणि रोगप्रतिकारशक्ती शाबूत राखण्यासाठी लसूण अत्यंत गुणकारी आहे.

**मक्याचे कणीस** : पावसाळा आणि मक्याचे कणीस यांचं जवळच नातं आहे. उकडलेल्या मक्याच्या दाण्यासोबत एक वाटी उकडलेली कडधान्ये जरूर खावीत. मक्याचे भाजलेले कणीस खाताना अतिरिक्त मीठ आणि मसाले टाळावेत. गोडसर चवीचे कणीस एका वेळी तुम्हाला भरपूर प्रमाणात कर्बोदके देऊ करते.

# कठड्यांविना घोडवली पूल ठरतोय धोकादायक

**खोपोली : बातमीदार**

कर्जत तालुक्यातील घोडवली ते डोलवली दरम्यान असलेला पुलाला संरक्षक कठडे बसवावे या मागणीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले असून नुकत्याच या पुलावरून दुचाकीसह व्यक्ती वाहून गेल्याची घटना घडल्याने मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त होत आहे.

कर्जत, पळसदरी तसेच डोलवली रेल्वे स्थानक जाण्यासाठी घोडवली ग्रामस्थांना जवळचा आणि सोयीस्कर रस्ता असल्याने या पुलाचा वापर ग्रामस्थ विद्यार्थी मोठ्या प्रमाणात करतात. पावसाळ्यात ओढा दुथडी भरून वाहू लागला की पुलावरून देखील पाणी जाते .त्यामुळे आधीच संरक्षक कठडे विना असलेला पूल अधिक धोकादायक बनतो. कित्येक वर्ष ग्रामस्थ जीव मुठीत धरून या पुलावरून प्रवास करत आहेत. पुलाची दुरुस्ती व संरक्षक कठडे असावे यासाठी वारंवार मागणी करून देखील अपुरा निधीकडे सार्वजनिक बांधकाम विभाग बोट दाखवत आहे. शनिवारी घोडवली गावातील जितेंद्र पालांडे याच पुलावरून जात असताना तोल गेल्याने दुचाकीसह वाहून गेले. पुलाला संरक्षक कठडे असते तर दुर्घटना टळली असती. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये रोष आहे.


## ड्रायव्हर पाहिजे

**फॉर्च्युनर कारसाठी ड्रायव्हर पाहिजे**

१०२, सी–विंग, साक्षी पार्क–२, शिलोत्तर रायचूर, सुकापूर, नवीन पनवेल, जिल्हा रायगड (महाराष्ट्र)

माऊली एंटरप्रायजेस, जेएनपीटी, जासई–४१०२०६

संपर्क

**मोबाईल : ८९०८४००२१४**

**Email : ekanathpatil4141@gmail.com**


## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

ई–निविदा सूचना क्र : पमपा/उद्यान/२२२५/प्र.क्र.०३/५१६/२०२५ दिनांक : २८/०७/२०२५

| अनु. क्र. | कामाचे नाव | निविदा क्र. | दिलेल्या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. | इसारा रक्कम रुपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील नवीन पनवेल येथील से.१६, भूखंड क्र.०३,उद्यानाचे नुतनीकरण करणे. | PMC/ Garden/04 2025-26 | रु.८३,२०,००१/– (GST विरहित) | रु.८३,२००/– | |

या कामाच्या ई–निविदेबाबतची माहिती शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २९/०७/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**अतिरिक्त आयुक्त–I**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल**

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.३५४/३६४/२०२५
दिनांक : २८/०७/२०२५

## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

### जाहीर निविदा

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खाली नमूद कामांकरिता योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून जाहीर निविदा बी – १ नमुन्यात मागवीत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रु. (Without GST) | अनामत रक्कम रु. | निविदा प्रत किंमत + १८% विक्री कर= एकूण निविदा किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १. | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती – 'अ' मधील **बेलपाडा सेक्टर–०७** येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल व खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे इ.) (PMC/CE/ ११६/२५–२६) | ३,३७,०४३/– | ३४००/– | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| २ | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती – 'अ' येथील **खारघर – कोपरा गाव, सेक्टर– १५** येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल व खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे इ.) (PMC/CE/११७/२५–२६) | ४,२९,५७९/– | ४३००/– | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| ३ | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती – 'अ' येथील **तळोजा फेज–१ (पेठाली)** येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल व खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे इ.) (PMC/CE/११८/२५–२६) | २,६७,९८९/– | २७००/– | २००+३६=२३६ | १५ दिवस |
| ४ | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'अ', **खारघर, सेक्टर–१४** येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल व खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे इ.) (PMC/CE/ ११९/२५–२६) | ४,२१,४८७/– | ४२००/– | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| ५ | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती – 'अ' येथील **मुर्बी तलाव** गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल व खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे इ.) (PMC/CE/१२०/२५–२६) | ३,०७,१११/– | ३१००/– | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| ६ | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती – 'अ' येथील **खुटूक बांधण** गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल व खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे इ.) (PMC/CE/१२१/२५–२६) | ३,०८,९८८/– | ३१००/– | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| ७ | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'अ' येथील **ओवे पेठ** येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल व खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे इ.) (PMC/CE/१२२/२५–२६) | ३,०७,१११/– | ३१००/– | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| ८ | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती – 'अ' येथील **पापडीचा पाडा** येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल व खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे इ.) (PMC/CE/१२३/२५–२६) | ३,०९,२२९/– | ३१००/– | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| ९ | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती –'अ' येथील **नावडे** येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल व खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे इ.) (PMC/CE/ १२४/२५–२६) | ३,०९,५२६/– | ३१००/– | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| १० | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'अ' येथील **खारघर, सेक्टर–१० ( कोपरा) खाडी जवळ** गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल व खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे इ.) (PMC/CE/१२५/२५–२६) | ३,१२,२४१/– | ३१००/– | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| ११ | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती – 'अ' येथील **रांजणपाडा** येथील गणेश घाटा जवळ विविध सुविधा पुरविणे. (मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल व खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे इ.) (PMC/CE/१२६/२५–२६) | ३,०५,३७६/– | ३१००/– | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| १२ | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती – 'ब' येथील **सेक्टर– २, खांदा कॉलनी शंकर मंदिर** गणेश विसर्जन घाट येथे विविध सुविधा पुरविणे. (मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल व खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे इ.) (PMC/CE/ १२७/२५–२६) | ३,१७,३८३/– | ३२००/– | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| १३ | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती – 'ब' येथील **सेक्टर– १२, कळंबोली** गणेश विसर्जन घाट येथे विविध सुविधा पुरविणे. (मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल व खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे इ.) (PMC/CE/१२८/२५–२६) | ३,२७,१०४/– | ३३००/– | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| १४. | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती – 'ब' येथील **आदई तलाव** गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल व खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे इ.) (PMC/CE/१२९/२५–२६) | ३,९२,९३०/– | ३९००/– | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| १५. | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ब' **खिडूकपाडा** गावातील गणेश घाटाची दुरुस्ती आणि विविध सुविधा पुरविणे. (मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल व खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे इ.)(PMC/CE/१३०/२५–२६) | २,९१,८८९/– | २९००/– | २००+३६=२३६ | १५ दिवस |
| १६ | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती – 'क' येथील **जुई गाव** येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल व खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे इ.) (PMC/CE/१३१/२५–२६) | ३,०७,१११/– | ३१००/– | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| १७ | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्र. समिती – 'क' मधील **कामोठे गाव (शंकर मंदिर)** येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल व खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे इ.) (PMC/CE/१३२/२५–२६) | ४,२३,२२९/– | ४२००/– | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| १८. | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती – 'ड' येथील **पोदी, रेल्वे भूयारी मार्ग जवळ** गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल व खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे इ.) (PMC/CE/१३३/२५–२६) | २,१५,७०५/– | २२००/– | २००+३६=२३६ | १५ दिवस |
| १९. | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ड' येथील **नविन पनवेल, सेक्टर–१४, धारण तलाव** गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे, (मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल व खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे इ.)(PMC/CE/१३४/२५–२६) | २,६१,२६१/– | २६००/– | २००+३६=२३६ | १५ दिवस |
| २०. | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ड येथील **काळुंद्रे** गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे व विविध सुविधा पुरविणे. (मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल व खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे इ.) (PMC/CE/१३५/२५–२६) | २,०३,५८५/– | २०००/– | २००+३६=२३६ | १५ दिवस |
| २१. | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती – 'ड' येथील **भिंगारी नांदगाव रस्ता** येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल व खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे इ.) (PMC/CE/१३६/२५–२६) | २,००,४६८/– | २०००/– | २००+३६=२३६ | १५ दिवस |
| २२. | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. २० येथील **तक्का गणेश घाट** येथे मुर्ती विसर्जन करीता मनुष्यबळ पुरविणे. (PMC/CE/१३७/२५–२६) | १,८८,२३०/– | १९००/– | २००+३६=२३६ | १५ दिवस |
| २३. | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. १९ येथील **कोळीवाडा गणेश घाट व देवी घाट** येथे गणेश मुर्ती विसर्जन करीता मनुष्यबळ व होडी पुरविणे. (PMC/CE/१३८/२५–२६) | ३,४४,३९४/– | ३५००/– | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| २४. | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ब' येथील **सेक्टर – १२ कळंबोली** गणेश विसर्जन घाट येथे गणेश मुर्ती विसर्जन करीता **विंच मशीन बसविणे** व विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/१३९/२५–२६) | ३,०४,१४५/– | ३१००/– | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| २५. | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील किरवणे, धानसर आगरीपाडा, धानसर–मराठापाडा, तुर्भे, सिध्दी करवले, पेंधर, पेंधर–श्रीपान पाटील यांच्या घराजवळील तलाव, तोंडरे–वरचा पाडा, टेंभोडे, वळवली, कळंबोली गाव, म्हसोबा तलाव से.–१२, कळंबोली (रोडपाली) इत्यादी ठिकाणी गणेश मुर्ती विसर्जना करीता **तराफा पुरविणे.** (PMC/CE/१४०/२५–२६) | ३,८२,३२१/– | ३८००/– | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| २६. | गणेशोत्सव २०२५ करीता पनवेल महानगरपालिका प्रभाग क्र.०२ मधील **तोंडरे** येथील अस्तित्वात असलेल्या गणेश विसर्जन घाटाची दुरुस्ती करणे. (PMC/CE/१४१/२५–२६) | ४,४६,२०९/– | ४६००/– | ५००+९०=५९० | १५ दिवस |

याकामी कोरी निविदा दिनांक ३०/७/२०२५ पासुन दि. ६/८/२०२५ पर्यंत सांय. ५.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत) बांधकाम विभागात उपलब्ध होतील.

१) अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफट निविदेसोबत लखोटा क्र. १ मध्ये सादर करण्याचा आहे.

२) सीलबंद निविदा दि. ११/०८/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या बांधकाम विभागात स्विकारण्यात येतील.

३) प्राप्त झालेल्या निविदा शक्यतो दि. ११/०८/२०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता शहर अभियंता यांच्या दालनात उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.

प्राप्त निविदेतील १ अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजुर अथवा ना मंजुर करण्याचा हक्क पनवेल महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

**सही/–**
**अतिरिक्त आयुक्त–I**
पनवेल महानगरपलिका

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.३५९/३६९/२०२५
दिनांक : २८/०७/२०२५

## निवडक

### चिरले येथे मंगळागौरी पूजन



**उरण :** तालुक्यातील चिरले येथे मंगळवारी (दि.२९) मंगळा गौरी पूजन सकाळी ९ वाजता होणार असून मंगळागौरी विसर्जन बुधवारी (दि.३०) सायंकाळी होणार आहे, असे विश्रांती घरत यांनी सांगितले. यंदाचे ५ वे वर्ष आहे. या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आयोजकांनी संगितले. या कार्यक्रमास सुनिता घरत, प्रतिभा घरत, विश्रांती घरत, प्राजक्ता घरत आदींचे सहकार्य मिळणार आहे.

### मशीद, मदरसा ट्रस्टींची बैठक



**पनवेल :** तालुका पोलिसांनी हद्दीतील मशीद, मदरसा ट्रस्टी यांची बैठक घेऊन त्यांना आवश्यक त्या सूचना केल्या. पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मशीद, मदरसा ट्रस्टी यांची बैठक वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. या वेळी पोनी कांबळे यांनी पोलीस महासंचालक यांचे स्थायी आदेश क्र. ०२/२०२५ दिनांक २१/०७/२०२५ अन्वये. प्राप्त सुचना, आदेशाचे अनुषंगाने ध्वनी प्रदूषण संदर्भात योग्य ते मार्गदर्शन केले. बैठकीस १० पदाधिकारी उपस्थित होते.

### विसपुते कॉलेजला अ‍ॅवॉर्ड



**पनवेल :** श्री. डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर, पनवेल यांना महाराष्ट्र राज्य फार्मसी परिषदेच्या वतीने जागतिक फार्मासिस्ट दिन २०२४ च्या औचित्याने कॉलेज विभागातील अ‍ॅवॉर्ड ऑफ एक्सलन्स हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. हा पुरस्कार मुंबई विभागातून फार्मसी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल देण्यात आला. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून संजिव नाईक (माजी खासदार) आणि स्टेट केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे साहेब उपस्थित होते. त्यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आशिष जैन यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

# दिवाळे जेट्टीवर स्वच्छता मोहीम

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयतर्फे स्तुत्य उपक्रम



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे सोमवारी (दि.२८) सकाळी ८ वाजता दिवाळे गावच्या जेट्टीवर स्वच्छता मोहीम राबविण्यात आले.

या स्वच्छता मोहिमेमध्ये स्थानिक नागरिक, स्वयंसेवी संस्था आणि नवी मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने ही मोहीम यशस्वीपणे झाली. या उपक्रमात मोठ्या संख्येने राष्ट्रीय स्वयंसेवकांनी जेट्टी परिसरात साचलेला कचरा, प्लास्टिक, तसेच सागरी कचरा हटवण्यात आला. हा उपक्रम पर्यावरण रक्षण आणि स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने घेण्यात आला. या वेळी स्थानिक पर्यावरण कार्यकर्ते आणि पालिकेच्या अधिकाऱ्यांनी उपक्रमात सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना स्वच्छतेबाबत शपथ देण्यात आली आणि भविष्यात अशा उपक्रमात सातत्याने सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या पर्यावरणीय उपक्रमाचे यशस्वीरित्या आयोजन केल्याबद्दल राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सर्व प्राध्यापक व राष्ट्रीय स्वयंसेवक आमचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमाचे आयोजन प्रा. प्रथमेश ठाकूर व प्रा. आनंद शेलार यांनी केले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. राहुल कांबळे, प्रा. शितल चव्हाण, प्रा. सर्वेश महाजन, प्रा. नीलम मोरे व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## भाजपतर्फे विद्यार्थ्यांचा गौरव



**नवी मुंबई : बातमीदार**

दिघा येथील भाजपाच्या माजी नगरसेविका उज्वला झंजाड तसेच समाजसेवक विकास झंजाड यांनी घरोघरी जात सातशे पेक्षा जास्त दहावी, बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गौरव केला. त्यांना फाईल फोल्डर व सन्मानपत्र देऊन गौरविले.

दिघा येथील ईश्वरनगर, बाली नगर, सदगुरू नगर, उत्तर भारतीय चाळ, मनूभाई चाळ.बॉबी चाळ, बंजारा पाडा, ओम साई दर्शन चाळ, १ ते १३ तपस्या चाळ, पांडे भवन परिसर, सिडको वसाहत, बालाजी नगर, खारकर वाडी, अमृतजल सोसायटी, साईराज सोसायटी, स्वामी विवेकानंद शाळा परिसर, संजीवनी स्कूल परिसर, बिल्डिंग दुकान लाईन येथील विद्यार्थ्यांना घरोघरी जाऊन गौरविण्यात आले.

या वेळी विकास झंजाड यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचाली विषयी संवाद साधत, त्यांचे ध्येय जाणून घेतले. तसेच कोणत्याही अडचणी असल्यास आम्ही तुमच्या सोबत असल्याचा दिलासा विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना दिला. दरवर्षी झंजाड कुटुंबीय हा उपक्रम राबवत असतात.

## केबीपी कॉलेजमध्ये आरोग्य तपासणी शिबिर



**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी)कॉलेजमध्ये आरोग्य आणि कल्याण समिती, राष्ट्रीय सेवा योजना युनिट आणि एम. जी. एम. मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल ऑण्ड रिसर्च सेंटर, वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने २५ व २६ जुलै रोजी दोन दिवसीय मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी लाभ घेतला.

शिबिराचे उद्घाटन एम. जी. एम. हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. दीपक राऊत, उपअधीक्षक डॉ. संजय गाईवले, नर्सिंग अधीक्षक डॉ. ज्योती चौधरी आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक लेफ्टनंट सारंग भागवत यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. या शिबिरात रक्तदाब, साखर तपासणी, हिमोग्लोबिन, बी.एम.आय., डोळ्यांची तपासणी आदी विविध आरोग्यविषयक चाचण्या करण्यात आल्या. या शिबिरात पाचशेहून अधिक विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी आपली आरोग्य तपासणी करून घेतली.

या शिबिराचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रो.डॉ.शुभदा नायक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. महाविद्यालयातील आरोग्य आणि कल्याण समितीच्या अध्यक्षा डॉ. अश्विनी पांडे एनएसएस प्रकल्पाधिकारी डॉ. प्रणिता भाले, नितीन गमरे यांनी सदर शिबिर यशस्वी करण्यासाठी उत्तम प्रकारचे नियोजन केले. एनएसएस स्वयंसेवकांनी हे शिबिर यशस्वी करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

## विद्यार्थ्यांना सापांविषयी मार्गदर्शन



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा रबाळे व बेलापूर आयोजित नागपंचमी सणाचे औचित्य साधून सर्प विज्ञान माहितीपर व्याख्यान नवी मुंबई पालिका संचलित पीएम श्री राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय आंबेडकर रबाळे येथे संपन्न झाले. यामध्ये नेचर फ्रेंड्स क्लब पनवेलचे सर्पमित्र संतोष उदरे, अनिशा हातमोडे यांनी पी पी टी द्वारे माहिती विद्यार्थ्यांना दिली.

विषारी, बिनविषारी व निम विषारी सापांच्या प्रजाती ते कुठे आढळतात? कोणते साप फायदेशीर आहेत? शेतकऱ्यांचे मित्र आहेत? त्याचबरोबर साप चावल्यानंतर आपण काय काळजी घेतली पाहिजे? साप या प्राण्याबद्दल समाजामध्ये काय अंधश्रद्धा आहेत? व त्या कशा चुकीचे आहेत? हे या संबंधीचे सविस्तर विवरण मुलांना सांगण्यात आले. मुलांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. या कार्यक्रमाचा लाभ ४१५ विद्यार्थ्यांनी घेतला.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक बेलापूर शाखेचे कार्याध्यक्ष महेंद्र राऊत यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विविध उपक्रम विभागाचे किरण वाळुंज यांनी केले. आभार ज्योती क्षीरसागर यांनी मानले. कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक व रबाळेचे प्रधान सचिव अमोल खरसंबळे, केंद्र समन्वयक व रबाळेचे कार्याध्यक्ष अविनाश जाधव, ज्येष्ठ शिक्षक विनायक थिटे, गजानन वाघ, संतोष वाजे, प्रदीप परदेशी,विनोद झापडे, वैशाली धनावडे, कावेरी व, रोहिणी पाटील, नीतू गावित, पवन कोकाटे, प्रियांका राऊत इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संयोजन शिक्षक मेथाजी देसाई, विजय चौरे, द्वारका वाघे, दिपक चाबुकस्वार,शशीकांत रणखांबे, प्रा.अमोलकुमार वाघमारे, तांत्रिक सहायक कृष्णात घाडगे, निलेश कांबळे यांच्यासह सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी केले.




## महिला रंगल्या मंगळागौर खेळात

**नवी मुंबई : मंगळागौर**

वाशीचे विष्णुदास भावे नाट्यगृह नवी मुंबईतील महिलांच्या गर्दीने अक्षरशः फुलून गेले होते. आ. मंदा म्हात्रे यांच्या श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्थेच्यावतीने मंगळागौरीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तरुणींपासून वयोवृद्ध महिलापर्यंत साऱ्यांनीच या देहभान विसरून कार्यक्रमात आपले पारंपरिक मंगळागौरीचे खेळ सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

यात कुणी साध्या गृहिणी होत्या, कुणी अभियंता, कुणी शिक्षक, कुणी प्राचार्या, कुणी बचतगट संचालिका, तर कुणी वेलनेस गुरू. यामुळे कार्यक्रमात सहभाग घेतलेल्या महिलांसह उपस्थित महिला, प्रमुख पाहुण्यांनी आयोजक आमदार मंदा म्हात्रे यांचे कौतुक करून मंगळागौरीच्या खेळांचा आनंद लुटला.

बालगंधर्व पुरस्कार २०२३ सन्मानित महाराष्ट्र लावणी सम्राट आशीमिक कामठे यांच्या लावणीने अक्षरशः सभागृह टाळ्यांच्या आवाजाने दुमदुमला. महिला व्यासपीठावर मंगळागौरीचे खेळ, गाणी सादर करीत असताना सभागृहात उपस्थित महिलांनी नाचगाण्याचा मनमुराद आनंद लुटला. प्रथम परितोषिक म्हणून सीवूड्स येथील राजमाता जिजाऊ महिला मंडळ व नेरूळ (प) मधील हाऊस क्वीन मंगला गौर ग्रुप यांना प्रत्येकी ५००१ रुपये व दोन पैठणी सहित एक नथ, तर द्वितीय पारितोषिक सीबीडी येथील सह्यद्री मंगळागौर ग्रुप यांना ३००१ रुपयांचे व एक पैठणी सहित एक नथ, तर तृतीय पतितोषिक साई भक्त महिला फाउंडेशन यांना २००१ एक पैठणी सहित एक नथ व सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. याशिवाय उत्तेजनार्थ म्हणून नेरूळ येथील सखी सोबती ग्रुपला १००१ रोख व प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले.

या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, माजी नगरसेवक तथा परिवहन समिती सदस्य काशिनाथ पाटील, माजी नगरसेवक राजू शिंदे, माजी नगरसेवक दीपक पवार, माजी नगरसेवक निलेश म्हात्रे, माजी नगरसेविका अनिता शेट्टी, सुचित्रा पवार, ज्योती पाटील, जयश्री चित्रे, समाजसेवक पांडुरंग आमले, विकास सोरटे, दत्ता घंगाळे, महेंद्र नाईक, प्रमोद जोशी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## मैथिलीच्या कुटुंबियांना प्रितम म्हात्रे यांचा आधार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अहमदाबाद येथे झालेल्या एअर इंडियाच्या विमान अपघातात कु. मैथिली मोरेश्वर पाटील हीचे निधन झाले होते. मैथिलीच्या कुटुंबीयांना भाजप नेते माजी विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांनी आधार देत त्यांच्या जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या वतीने तिच्या भावंडांचा शैक्षणिक भार उचलून त्यांना सहकार्य केले.

अहमदाबाद येथे झालेल्या एअर इंडियाच्या विमान अपघातात न्हावे येथील मैथिली पाटील हिचे निधन झाले. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत तिच्या कुटुंबीयांनी तिचे शिक्षण पूर्ण केले होते, मात्र विमान अपघातात तिचा मृत्यू झाला. तिच्या निधनानंतर तिच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला. सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून तिच्या भावंडांची पूर्ण वर्षाची शैक्षणिक फी संस्थेच्या वतीने भरण्यात आली.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात कारगिल विजय दिन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.२६) राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने कारगिल विजय दिन साजरा करण्यात आला.

हा दिवस दरवर्षी १९९९ च्या कारगिल युद्धात भारतीय जवानांनी दिलेल्या बलिदानाला व त्यांच्या शौर्याला श्रद्धांजली वाहण्यासाठी साजरा केला जातो. या वेळी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी कारगिल युद्धात बलिदान दिलेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पित केली.

या दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात विद्यार्थ्यांना देशभक्तीपर शेर शाह चित्रपट दाखवण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. प्रथमेश ठाकूर यांनी केले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. राहुल कांबळे, प्रा.आनंद शेलार, प्रा. नीलम मोरे, प्रा. शितल चव्हाण, प्रा. सर्वेश महाजन व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



## आदिवासी वाडीतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील पिरकोन येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या २००२ आणि २००३ च्या एसएससी बॅचच्या माजी विद्यार्थ्यांमार्फत सालाबाद प्रमाणे चिरनेर आदिवासीवाडी आणि केळ्याचा माळ आदिवासीवाडी येथील प्राथमिक शाळेच्या ४० विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमावेळी भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते रमेश फोफेरकर, कल्पेश म्हात्रे, महेश पाटील, विशाल पाटील, समाधान पाटील भूषण म्हात्रे भावेश गोंधळी, रजनीकांत पाटील, दुशांत ठाकूर, स्नेहा ठाकूर, मीनाक्षी पाटील, सुचिता पाटील तसेच शाळेच्या शिक्षकांसह अन्य जण उपस्थित होते.




### आठवणीतील श्रावण सरी...

झरझर बरसल्या सरी नभातून माला,
थेंबांचा जणू स्पर्श झाला मनाला!

ओल्या मातीचा गंध दरवळे अंगणात,
आठवाणींचा फुलोरा फुलवून मयुर नाचतो मनात!

शांत गगनात मिसळती वाऱ्याची साद,
श्रावण आला घेऊन मृदुगंध आणि निनाद!

पानांवर थेंब टिपकतात सावकाश,
निसर्ग देतो शब्द वीण मोत्यांची रास!

चिंब झाली झाडं हिरव्या डोंगर रांगा,
घनदाट पाऊस जणू धरतीवरची गंगा!

कधी थेंब नाजूक कधी सरींची तडतड,
मनात खोल कुठेशी हलकी धडधड!

कधी नदी वाहते गात गाणी श्रावणाची,
ओढे-पाण्यांनी भरते ओंजळ जीवनाची!

सजली सृष्टी सगळीकडे नवचैतन्याने,
ऋतूश्रावण गाई ह्रदयाचे गाणे!



-अशोक गायकवाड,
पनवेल.

# संवेदना संस्थेतर्फे घागर घुमू दे मंगळागौर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुलं पोटात असतानाच नात्यांची वीण वीणायला सुरुवात होते आणि जन्म झाल्यानंतर ही नाळ अनेक नात्यांमध्ये गुंफली जाते. वीण नात्यांची म्हणजेच कुटुंबातील, समाजातील व्यक्तींमध्ये असलेले भावनिक संबंध, जिव्हाळा आणि प्रेमळ नाते हे होय. यामधील मुख्य दुवा म्हणजे आपली आई त्यामुळे कार्यक्रमांची सुरवातच आईच्या आरतीने करण्यात आली.

घरातील भाऊ, बहीण, आत्या, मावशी इ. नात्यांबरोबरच लग्न झाल्यावर सासरी गेल्यावर अनेक नाती तिला निभावयाची असतात. हेच नाते उलगडवून सांगणारा सुंदर प्रवास म्हणजेच संवेदना मंगळागौर घागर घुमू दे हा होय. स्वतः च्या आनंदासाठी अलिबाग, पेण, बांधण, कोमोठे, खारघर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पनवेल आणि आजूबाजूच्या परिसरातूनही महिला आल्या होत्या. दरवर्षी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महिलांना वेगवेगळ्या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. त्यातील उत्कृष्ट मंगळागौरीचे खेळ खेळणाऱ्या महिलेला संवेदना श्रावणक्वीन हा पुरस्कार देण्यात येतो. या वेळी या पुरस्काराची मानकरी ठरली सुप्रिया पाथरे तिचे मुकुट, सन्मानचिन्ह आणि भेटवस्तू देऊन कौतुक करण्यात आले. या मंगळागौरीत कोणतीही स्पर्धा न ठेवता केवळ आपल्या आनंदासाठी महिला दरवर्षी मोठ्या संख्येने मंगळागौर खेळण्यास येत असतात अश्या सर्व मैत्रिणींचे विशेष कौतुकच म्हणावे लागेल.

या वेळी अंजलीताई पाटील कोपरखैरणे यांनी परीक्षणाचे काम केले. गेले तेरा वर्ष संस्था सामाजिक, पर्यावरण आणि आपली मराठी संस्कृती कशी टिकेल यावर प्रबोधन करत आहे. सध्या सर्व स्तरावर त्रासदायक आणि गंभीर विषय म्हणजेच कचरा व्यवस्थापन हा होय. संस्था पनवेल हद्दीत सुका कचरा संकलनाचे कामे करत आहे. आतापर्यंत ३०० घरे जोडली गेली आहेत. अनेक घरे यामध्ये जोडली जावी ही इच्छा आहे. म्हणून यावेळी उपस्थिती महिलांना तसेच सर्व पनवेल वासियांना संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा सुनेत्रा गवाणकर यांनी या चळवळीत सामील होण्यास आवाहन केले आणि कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# खंडाळा घाट अवजड वाहनांमुळे धोकादायक

## महिन्यात तीन बळी; दहापेक्षा अधिक जखमी

**खोपोली : प्रतिनिधी**

जुन्या मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर खोपोली मार्गे पुण्याला जाणा-या अवजड वाहनांवर बंदीची गरज निर्माण झाली असून, महिन्याभरात भीषण अपघातात तीन ठार आणि दहापेक्षा अधिक जखमी झाले आहेत.

मुंबई पुणे द्रुतगती मार्ग अस्तित्वात आल्यापासून ट्रक ,ट्रेलर ,टँकर व कंटेनर यासारखे अवजड वाहने द्रुतगती मार्गाचा वापर करतात. द्रुतगती मार्गा मुळे जुन्या राष्ट्रीय महामार्गावरील कठीण खंडाळा घाटाचा प्रवास टाळला जातो. द्रुतगती मार्गावरून खंडाळा लोणावळा घाट अवजड वाहन सहज पार करतात. परंतु या मार्गावर असलेला टोल वाचवण्यासाठी काही अवजड वाहनांचे चालक खोपोली सायमाळ मार्गे जुन्या घाटाने जाण्याचा पर्याय निवडतात .परंतु अवघड वळण, कठीण चढाव यामुळे अनेकदा अवजड वाहन अडकून बसतात.



महिनाभरात अशा दोन घटना घडल्या असून लोखंडी अवजड पाईपची वाहतूक करणारा ट्रक अवघड वळणावर बंद पडून पाईप ट्रकमधून बाहेर फेकले गेल्याने दोन महिलांचा मृत्यू तर सहा जण जखमी झाले. दुस-या घटनेत जुन्या मार्गाने जाणारा कंटेनर अवघड घाट रस्ता आणि वळणामुळे अर्ध्या रस्त्यातून माघारी फिरला आणि घाट उतरताना अनियंत्रित होवून कारला धडकला होता. या अपघातात देखील प्रवासी महिला ठार तर पाच जण जखमी झाले होते दोन भीषण अपघातामुळे या मार्गावर अवजड वाहनांना बंदी घालावी अशी मागणी होत आहे

**महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, आय आर बी यंत्रणेशी याबाबत काय उपाययोजना करता येतील याचा आढावा घेत आहोत. शिवाय या भागातील कारखान्यातून अवजड वाहतूक करणारी वाहन द्रुतगती मार्गाने जातील यासाठी सूचना करत आहोत.**
**-सचिन हिरे,**
**पोलीस निरिक्षक खोपोली**

# सुदर्शन केमिकल कंपनीचा नाविन्यपूर्ण उपक्रम-एक झाड पुढच्या पिढीसाठी

**धाटाव, रोहा : प्रतिनिधी**

एक झाड पुढच्या पिढीसाठी या सामाजिक संकल्पनेखाली सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेड रोहा आणि वनविभाग, रोहा यांच्या संयुक्त विद्यमाने चिंचवली तर्फे दिवाळी येथे सुदर्शन चे साईट हेड विवेक गर्ग व सी.एस.आर विभाग प्रमुख माधुरी सणस यांच्या विशेष संकल्पनेतून वनसंवर्धन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.सदर कार्यक्रमातून सुदर्शनच्या माध्यमातून पर्यावरणावरील भावनिक जबाबदारी, सामाजिक कर्तव्यनिष्ठा आणि पिढ्यांतर्गत वारशाचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.



सुदर्शन केमिकल्सच्यावतीने रोहे तालुक्यातील चिंचवली येथे रायगड जिल्ह्याचे वन विभागाचे डीएफओ शैलेंद्र कुमार जाधव यांच्या सकारात्मक सहकार्याने एक हेक्टर जागा उपलब्ध करुन एक हजार भारतीय प्रजातीय रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमाचा शुभारंभ माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या शुभहस्ते झाला.

यावेळी अनिकेत तटकरे यांनी बोलतांना, या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश रोहा परिसरातील वनीकरणास चालना देणे, स्थानिक वनसंपत्तीचे संवर्धन करणे, औद्योगिक वाढ आणि पर्यावरण संतुलन यात सुसंवाद साधणे आणि सर्व भागधारकांनी म्हणजेच सुदर्शन कंपनी, वनविभाग, स्थानिक प्रशासन, पर्यावरण तज्ञ या सर्वांनी एकत्र येऊन वृक्षसंवर्धनाबरोबरच जैवविविधता वाढवण्या करीता फुलपाखरांचे उद्यानासारखे ही प्रकल्प हाती घ्यावे अशी वाटचाल करण्यास प्रवृत्त करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले..त्यांनी या प्रकल्पाला केवळ झाडे लावण्यापेक्षा अधिक व्यापक दृष्टीकोनातून पाहिले आहे.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेमध्ये सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेड च्या सी.एस. आर विभाग प्रमुख माधुरी सणस यांनी हा प्रकल्प केवळ मातीत नव्हे तर ह्रदयात रुजवण्याचा प्रयत्न आहे ! कारण पुढील दोन वर्षांत सुदर्शन केमिकल अंतर्गत या रोपांची योगय काळजी व यश्सवी संगोपण करण्यात येणार आहे.तसेच वनसंवर्धनाच्या संगोपनाच्या विस्तारला उपस्थित कर्मचारी वर्गाने प्राधान्य द्यावे असे आवाहन करण्यात आले . पुढच्या पिढीसाठी हरित वारसा देणे, ही आमची कर्तव्यनिष्ठ शपथ आहे.तसेच यापुढेही वन विभागांच्या सहकार्यातून वन विभागाच्या आरक्षित जागांत वृक्षारोपण अभियान राबवणार असल्याचे त्यांनी सांगितले व सुदर्शन केमिकलचा हा प्रयत्न रोह्यातील पर्यावरण प्रेमाचा भावनिक पाया व नाते रुजेल , अशी अपेक्षा व्यक्त केली.

त्याचप्रमाणे सुदर्शन केमिकलचे विवेक गर्ग यांनी मार्गदर्शन दरम्यान कर्मचा-यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होत हा उपक्रम यशस्वी केल्याबद्दल कौतुक करताना या मार्गावरून जाताना कर्मचा-यांनी आपण लावलेल्या झाडांची योग्य ती जोपासना होत व वाढ होत असल्याकडे लक्ष देण्याची सूचना केली.रोहा तालुक्याच्या वनविभागाचे आरएफओ चौबे यांनी बोलत असता सुदर्शन कंपनीच्या या प्रकल्पाला पर्यावरण प्रेमाचा आदर्श म्हणून गौरवले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी महेश देरिया,संजय कचरे,दिशांत ढाणे ,अमर चांदणे, स्वाती पवार, पराग फुकणे ,विक्रम वाबळे यांसह सुदर्शन कंपनीच्या कर्मचा-यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी आणि रोहा वनविगाचे सर्व पदाधिकारी कर्मचाऱ्यांसह विशेष परिश्रम घेतले.

# ज्ञानदिप माध्यमिक विद्यामंदिर बोरघर हवेलीच्या विद्यार्थ्यांना सँडल वाटप

**तळा : प्रतिनिधी**

ज्ञानदिप माध्यमिक विद्यामंदिर, बोरघरहखेली ता. तळा या विद्यालयातील विद्यार्थ्यांना श्रीमती वालीबेन जेटालाल छेडा परिवारातर्फे सँन्डल वाटपाचा कार्यक्रम नुकताच पारपडला. शाळेमध्ये अनेक गावांतून दूर दूर अंतरावरून चालत यावे लागत असल्याने या परिवाराने विद्यार्थ्यांची गरज ओळखून सँडल वाटप करण्याचे चांगले कार्य केले आहे.विद्यार्थ्यांना सॅन्डेल मिळाल्याने सर्वच विद्यार्थ्यांनाच्या चेहऱ्यावरती यावेळी आनंद दिसून येत होता.

रायगड भूषण कृष्णा महाडिक यांचे प्रयत्नांनी आणखी एक विद्यार्थांसाठी चांगले काम केले गेले. या कार्यक्रमासाठी जयंतीभाई छेडा, धनजीभाई गाला, विजय नागरथ, कृष्णा महाडीक, मुख्याध्यापिका किरण काप, प्रशांत शिंदे, विनोद लाड, श्री. कांबळेकर, शिक्षिका सौ.खांडेकर, सौ. मांडवकर, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. या सेवाभावी कार्याबद्दल मुख्याध्यापकांनी छेडा परिवाराचे आभार मानले.



# आर्य अमर पापळ शिष्यवृत्तीत परिक्षेत तालुक्यात प्रथम

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा तळाशी केंद्र वावोशी येथील इयत्ता चौथी पर्यंत शिक्षण घेतलेला माजी विद्यार्थी कुमार आर्य अमर पापळ याने महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये ८४.५६ टक्के गुण प्राप्त करून खालापूर तालुकास्तरावर प्रथम तर रायगड जिल्हा गुणवत्ता यादीत चतुर्थ क्रमांक प्राप्त करत शाळेचे नाव उज्वल केले. सन २०२४/२५ घेण्यात आलेल्या जवाहर नवोदय प्रवेश परीक्षेत ९३.७५ टक्के गुण पटकावून जवाहर नवोदय विद्यालय निजामपुर रायगड येथे प्रवेश मिळवला.२०२४/२५ घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय मंथन परीक्षेत खालापूर सेंटर मध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला,तसेच महाराष्ट्र राज्य गणित अध्यापक मंडळामार्फत घेण्यात आलेल्या गणित संबोध परीक्षेत ९८ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक आणि गणित प्रज्ञाशोध परीक्षेत जिल्हास्तरावर रौप्य पदक प्राप्त केले .

# जिल्हास्तरीय वैश्य वाणी विद्यार्थी गुणगौरव सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा वैश्य समाज संघ, शिक्षण समिती आयोजित कै. विकास मनोरे (पेण) आणि कै. हरिभाऊ चौधरी (चौक) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय शैक्षणिक वैश्य वाणी विद्यार्थी गुणगौरव सोहळा २०२३-२४ चे आयोजन वैश्य समाज सेवाभावी संस्था सभागृह, चौक येथे ३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे.

समाजातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टिकोनातून व समाज उन्नतीसाठी विद्यार्थी बक्षीस वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या वेळी अशोक भोपतराव, अध्यक्ष रायगड जिल्हा वैश्य समाज, प्रमुख पाहुणे विलास गणपत मनोरे माजी अध्यक्ष, चंद्रशेखर हरिभाऊ चौधरी उद्योजक, दीपक खाडे मार्गदर्शक, दत्तात्रय तांबोळी उपाध्यक्ष, राजेंद्र फडके उपाध्यक्ष, रवींद्र झिंजे उपाध्यक्ष, उदय मनोरे, मनोज आंग्रे युवक अध्यक्ष रायगड, शामल आंग्रे महिला अध्यक्ष, राजेंद्र चौधरी सेक्रेटरी, चेतन शहाणे सेक्रेटरी उपस्थित राहणार आहेत.

# संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनचे रक्तदान शिबिर

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन व्दारा आयोजित, संत निरंकारी मिशनच्या माध्यमातून रक्तदान शिबिराचे आयोजन मानी संत्सग भवन अलिबाग येथे 'अलिबाग ब्रँच' आणि पोयनाड ब्रँच तर्फे करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमाचे उद्घाटन रायगड व चिपळूण झोनचे झोनल प्रमुख व ब्रम्हज्ञान प्रचारक, प्रकाश म्हात्रे तसेच,विजय आहेर संयोजक, अलिबाग ब्रँच ,पोयनाड ब्रँचचे मुखी मारुती पाटील गुरुजी, महाड येथून आलेले ब्रम्हज्ञान प्रचारक अनिल सकपाळ ,सारळ ब्रँच चे मुखी देवानंद पाटील, भिलजी ब्रँच चे मुखी सुरेश गावंड, डॉ अंकुश शिंदे ,डॉ. सुनंदा शिंदे, डॉ.श्रेयस पाटील, व सेवादल संचालक जगदिश कोळी, आदींच्या उपस्थितीत दिप प्रज्वलन करण्यात आले.

झोनल प्रमुख प्रकाश म्हात्रे यावेळी म्हणाले की, अनेक समाजपयोगी कामे यामध्ये रक्तदान शिबीर, वृक्षारोपण,जल स्रोत/रेल्वेप्लेटफॉंम/गाव/शहर स्वच्छता अभियान ,डोळे तपासणीशिबीर,आरोग्य शिबीर, फ्री डिस्पेन्सरी, अनेक शाळा कॉलेज मधून शैक्षणिक कार्य इ. समाजपयोगी अभियान संत निरंकारी मिशनच्या माध्यमातून राबविण्यात येतात, असे ते यावेळी म्हणाले. सदर रक्तदान शिबिरात एकूण ६९ जणांनी रक्तदान करून मिशनचे कार्य सफल केले. यावेळी जिल्हा रुग्णालय रक्तकेंद्रातर्फे डॉ. श्रेयस पाटील, हेमकांत सोनार,नवनाथ अळी,वैभव कांबळे, अभिषेक घरत, सुशांत भगत,साक्षी मयेकर,वैष्णवी महाले,मंगेश पिंगळा, मयूर पाटील आदिंनी रक्तसंकलनाचे काम केले.




रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी संत निरकांरी मंडळ अलिबाग ब्रँच,पोयनाड ब्रँच येथील सेवादल बंधुभगिनीं,साधसंगतचे सदस्य व परिसरातील ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देऊन रक्तदान शिबीर यशस्वी केले. सुत्रसंचालन ममता म्हात्रे तर आभार विजय आहेर यांनी मानले.

# तळा येथे कारागीर गणेशमूर्ती बनविण्यात मग्न

## शाडूच्या मातीच्या मूर्तींना अधिक मागणी

**तळा : प्रतिनिधी**

तळा शहातील शिंदे चित्र शिल्पालयातील गणेश मूर्तीना दूर दूर वरून मागणी होत आहे मागणी.यावर्षीच्या मागणीत वाढ झाली आहे.मात्र शाडूचीमाती,प्लास्टर ऑफ पॅरिस, रंगाचे भाव अंदाजे ३०% ने वाढल्याने मूर्तींच्या किंमतीत वाढ झाल्याचे दिसून येत आहे.त्यातच शिल्पकारानी मे पासून तळा तालुक्यात मुर्ती तयार करण्यास सुरुवात केली आहे.आजपर्यंत या चित्रशिल्पालयात ४५५गणेशमूर्ती घडवल्या आहेत. रंगकाम करण्यास आता सुरुवात केली आहे.या गणेशमूर्ती तालुक्यासह माणगाव,रोहा,मुरूड,म्हसळा इत्यादी ठिकाणी जातात.



तालुक्यातील शिंदे चित्र शिल्पालयाच्या सतिश हरिश्चंद्र शिंदे यांच्याशी संवाद साधला असता.ते म्हणाले की आमच्या शिंदे चित्र शिल्पालय कारखान्यास २००० मधे सुरूवात केली.सुरूवात करण्यापूर्वी इतर ठिकाणी रंगकाम व मूर्ती स्वतः हाताने घडवत होतो.नंतर स्वतःचा स्वतंत्र असं शिल्पालय असावं व त्यासाठी सर्वांनी मला मार्गदर्शन केले व काम सुरू केले.सुरूवातीला काही ठराविक मूर्ती तयार केल्या.

गणेश भक्तांना मूर्ती आवडल्या आणि मागणीत वाढ होऊन आजच्या स्थितीत ४५५ मुर्तीची मागणी आहे.त्यात शाडूच्या मूर्ती ५० व ४०५ प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती तयार केल्या आहेत.यावर्षी रंग,शाडूचीमाती ,व इतर साहित्याच्या किंमती वाढल्याने गणेशमूर्तींच्याही किंमतीत वाढ झाली आहे.१५ जून पासून मुर्ती तयार करण्यास सुरवात झाली आहे.त्यातच गणेश भक्त सांगेल त्याप्रकारची मुर्ती तयार करून द्यावी लागते.एकूण सहा लाखांचे उत्पन्न असून एखाद लाख रूपये निव्वळ उत्पन्न मिळेल.एकूण दहा पंधरा कलाकार दोन तीन महिने येथे काम करत आहेत.या आमच्या येथून पुणे,खेड, रत्नागिरी , मुंबई,महाड, निजामपूर,अलिबाग,जोगेश्वरी, इंदापूर, म्हसळा , रोहा इत्यादी ठिकाणी गणेशमूर्ती जात असतात.असे ते म्हणाले.

तालुक्यातील उत्तम पेंन्टर व मुर्तीकार म्हणून प्रसिद्ध आहेत.तसेच त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांचा मुलगा आकाश देखील या क्षेत्रातील एक तज्ञ कारागिर म्हणून त्याची ओळख होत आहे. चांगल्या प्रकारच्या गणेश मुर्ती सतिश शिंदे हे घडवत आहेत. श्रीगणेश मुर्तीच्या रंगकामास सुरूवात झाली आहे. कोकणवासीयांचा हा सर्वांचा मोठा सण असून गावोगावी चाकरमानी न चुकता या गणेश उत्सवानिमित्त गावाकडे येतात.आता पासूनच घरांच्या डागडुजी करून आपल्या घरात श्रीगणेशाची प्रतिष्ठापना पाच दिवस तर काहींकडे अनंत चतुर्दशी पर्यंत असतात. कोणती श्रीगणेश मुर्ती आणायची हेही नियोजन करून त्याप्रमाणे मुर्ती सांगितली जात आहे.

# मुरूड आर्ट ऑफ लिविंगच्या माध्यमातून ५०० वृक्ष लागवड

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड आर्ट ऑफ लिविंग च्या माध्यमातून ५०० वृक्ष लागवड करण्यात आली आहे.यामध्ये फणस, जांभूळ, रामफळ, सीताफळ, चिंच,आवळा, वड आदी उपयुक्त वृक्ष लावण्यात आली आहेत.

वृक्ष लागवड कार्यक्रमाच्या वेळी मुंबई मधील आर्ट ऑफ लिविंगच्या शिक्षिका सुस्मिता गुरव,जैन समाजाचे अध्यक्ष हसमुख जैन,सुनील गुरव, मंगेश पाटील ,सौ शेडगे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.आर्ट ऑफ लिविंग चे सर्वेसर्वा पूज्य गुरुदेव श्री श्री रविशंकर पूज्य गुरुदेव ध्यान योग व विशेष म्हणजे सुदर्शन क्रिया च्या माध्यमातून १८० देशांमध्ये आपले कार्य मोठ्या प्रमाणात करत आहेत. त्यांनी आपल्या सर्व अनुयायांना पूर्ण जगामध्ये ग्लोबल वॉर्मिंगमुळे होणाऱ्या त्रासातून वाचण्यासाठी जास्तीत जास्त झाडे लावण्याचे आवाहन केले आहे.म्हणून मुरुड मधील त्यांच्या अनुयायांनी राजपुरी पंचायतीमधील सर्व क्षेत्रांमध्ये जांभूळ फणस चिंच रामफळ अशी विविध प्रकारची ५०० झाडे लावून हा उपक्रम साजरा केला आहे.

गुरुदेव यांचे आयुर्वेदिक एक विशिष्ट झाड लक्ष्मी तरु हे संपूर्ण तालुक्यामध्ये १००० झाडे लावण्याचा मानस आहे. तो मानस आम्ही सर्व अनुयायी लवकरच पूर्ण करणार आहोत




प्रोसेस फी जमा रू.

अर्जदारातर्फे वकील कु. सोनिया ना. शिरसाठ

**जाहीर नोटीस**

दिवाणी चौकशी अर्ज नं.२४२ /२०२५

**बेलापूर येथिल मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर, बेलापूर यांचे न्यायालयात**

N.D. ०९/०९/२५

श्री. शिवानंद राम सुर्यवंशी ................. **अर्जदार**

**विरूध्द**

श्रीमती. सीताबाई राम सुर्यवंशी, ............ **जाबदार**
व इतर १

सर्व लोंकाना या नोटिसद्वारे कळविण्यात येते की,
यापेक्षा **कै. राम बाळाप्पा सुर्यवंशी** यांचे दिनांक १५.१०.२०२४ रोजी **हनुमान नगर, तुर्भे नाका, तालुका-ठाणे, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र** येथे मयत झाले असून प्रस्तुतचे अर्जदार क्र. १ हा मुलगा आणि जाबदार क्र. १ ही आई व जाबदार क्र. २ ही बहीण असुन त्यांचे कायदेशिर वारस आहेत.

यांनी खालील वर्णाच्या मिळकतीबाबत वारसा दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

| मिळकत अनु क्र. | मिळकत |
|---|---|
| १. | **रूम नं. ५०८७, हनुमान नगर, तुर्भे नाका, नवी मुंबई** |

वरील अर्जदार हे मयत **कै. राम बाळाप्पा सुर्यवंशी** यांचे वारस आहेत, या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीला हरकत असल्यास, त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, या मे. कोर्टात हजर राहून हरकत घेतली नाही तर हे मे. कोर्ट वरील अर्जदार यांच्या अर्जा कामी पुरावा घेण्याची कार्यवाही करील.

तसेच अर्जदार हे **कै. राम बाळाप्पा सुर्यवंशी** यांचे वारस असल्याने शाबीत झाले तर त्यांस वारसादाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

आज दि. २८/०७/२०२५ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्कयासह दिली.

सही/- | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा. अधिक्षक

# पराभवाच्या जबड्यातून खेचला विजयश्रीसारखा ‘ड्रॉ’!

**मँचेस्टर : वृत्तसंस्था**

भारतीय संघाची नौका पराभवाच्या छायेत गटांगळ्या खात होती, त्यावेळी विजय तर सोडाच; पण अगदी सामना अनिर्णीत राखण्याचे किनारेसुद्धा दूर-दूरपर्यंत दिसत नव्हते; पण ही तीच वेळ होती, ज्यावेळी तीन तारणहारांनी सूत्रे आपल्या हाती घेतली. ते म्हणजे, शुभमन गिल, वॉशिंग्टन सुंदर अन् रवींद्र जडेजा. एकीकडे, शुभमन गिलने राजेशाही थाटातील फलंदाजीने आशेचा भक्कम पाया रचला.



दुसरीकडे, रवींद्र जडेजा झुंजार, आक्रमक शतक झळकावत असताना त्याची बॅट जणू तळपती तलवारच बनली आणि हे त्रिकुट पूर्ण करणार्या वॉशिंग्टन सुंदरने हिमालयासारखी अढळ खेळी करत संयमाचा असा काही महामेरू रचला ज्यासमोर, इंग्लंडच्या सर्व आशा-अपेक्षा त्यावर आदळून धुळीस मिळाल्या. या त्रिकुटाने केवळ सामनाच वाचवला नाही, तर भारतीय क्रिकेटच्या इतिहासात शौर्याचे एक सोनेरी पान लिहिले. अगदी पराभवाच्या जबड्यातून ‘ड्रॉ’ खेचून आणला... अगदी विजयश्रीसारखा ‘ड्रॉ’!

या सामन्याच्या शेवटच्या दिवशी २ बाद १७४ धावांवरून खेळाला पुढे सुरुवात केल्यानंतर के. एल. राहुल (९०) आणि शुभमन गिल (१०३) यांनी महत्त्वपूर्ण भागीदारी रचून संघाचा डाव सावरला. या दोघांनी भारतीय डावाला स्थिरता दिली. मात्र, खरा थरार तर त्यानंतर सुरू झाला. अष्टपैलू रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी इंग्लिश गोलंदाजांचा धैर्याने सामना करत मैदानावर अक्षरशः तळ ठोकला आणि त्यांची हीच ठाण मांडून ठेवण्याची अजोड कामगिरी सामना अनिर्णीत राखण्यात लाख मोलाचे योगदान देणारी ठरली.

एकापाठोपाठ चार अर्धशतके झळकावणाऱ्या जडेजाने (१०७*) येथे आपले पाचवे कसोटी शतक पूर्ण करताच जल्लोष केला.

### स्टोक्सचा ‘तो’ प्रस्ताव निष्फळ आणि इंग्लंडचे स्लेजिंगही निष्फळ!

भारतीय फलंदाजांची झुंज पाहून हताश झालेल्या इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने दिवसभरातील खेळात १५ षटके बाकी असताना बरोबरीचा प्रस्ताव दिला; पण शतकाच्या उंबरठ्यावरील जडेजाने तो नाकारला. यानंतर अनेकदा इंग्लंडच्या खेळाडूंनी शाब्दिक चकमक करत स्लेजिंगचे अस्त्रदेखील वापरले; पण ते ही निष्फळ ठरले.

# उरणमध्ये मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात

## न्हावाशेवा पोलीस व सागरी सुरक्षा रक्षक दलातर्फे उपक्रम

**उरण : प्रतिनिधी**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत असलेल्या उरण तालुक्यातील न्हावाशेवा पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी, पाणजे, डोंगरी गावातील सागरी रक्षक दलाचे सदस्य यांच्या यांच्या संयुक्त विद्यमाने सिडको कार्यालय फुंडे एसटी बस स्टॉप ते पाणजेपर्यंत सागरी सुरक्षा हेल्पलाईन आणि जनजागृतीच्या अनुषंगाने २०२५ च्या मॅरेथॉन स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते.

या मॅरेथॉन स्पर्धेमध्ये न्हावाशेवा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सागरी सुरक्षा दलाचे सदस्य, मच्छिमार बांधव, ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी, महिला दक्षता समिती सदस्या, या विभागातील तरुण विद्यार्थी, विद्यार्थिनी यांच्यासह पोलीस



अधिकारी व अंमलदार, कर्मचाऱ्यांनी या मॅरेथॉन स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

या वेळी या मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंना महाराष्ट्र पोलीस दलाचे ब्रीद वाक्य रेखाटलेले असलेल्या व सागरी सुरक्षा हेल्पलाईन नंबर १०९३चे पेंटिंग असलेले टीशर्ट परिधान करून या मॅरेथॉन स्पर्धेच्या माध्यमातून प्रसार व जनजागृती करण्यात आली.

या मॅरेथॉन स्पर्धेमध्ये न्हावाशेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक बापू ओवे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज गुंड, स.पो.नि.गणेश पाटील, पोलीस उपनिरीक्षक शांताराम लेंडे, पाणजे ग्रामपंचायतीचे सरपंच लखपती पाटील, अंमलदार जितेंद्र पाटील, मंगेश पवार, धर्मनाथ चेरू, प्रदीप म्हात्रे, संजय म्हात्रे, संदीप पाटील, प्रवीण गावित, कनिष्का नाईक, सचिता पाटील, किरण टिके, सोनारीचे राकेश कडू, डी.के.कडू, सुजाता कडू, डोंगरी गावचे संकेत घरत, किरण पाटील यांच्यासह २५० हुन अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेतील यशस्वी विजेत्यांना उत्तेजनार्थ आकर्षक अशी ट्रॉफी बक्षीस देण्यात आली.

# डिव्हिलियर्सची बॅट पुन्हा तळपली!

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडमध्ये वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लेजेंड्स स्पर्धेचा थरार सुरू आहे. या स्पर्धेतील १२वा सामना दक्षिण आफ्रिका चॅम्पियन्स आणि ऑस्ट्रेलिया चॅम्पियन्स या दोन्ही संघांमध्ये झाला. या सामन्यात आफ्रिका संघातील विस्फोटक फलंदाज एबी डिव्हिलियर्सने झंझावाती फलंदाजी करत ३९ चेंडूत आपले शतक पूर्ण केले.



**‘वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लेजेंड्स’मध्ये झंझावाती शतक**

या सामन्यात दक्षिण आफ्रिका संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. डिव्हिलियर्सने ४६ चेंडूंचा सामना करत १२३ धावांची वादळी खेळी केली. या स्पर्धेतील हे त्याचे दुसरे शतक ठरले. आपल्या खेळीदरम्यान त्याने १५ चौकार आणि आठ गगनचुंबी षटकार मारले. त्याने डार्सी शॉर्टच्या षटकात लागोपाठ तीन चौकार मारले. यासह त्याने आपले शतक पूर्ण केले, पण पिटर सिडलच्या षटकात त्याला बाद होऊन माघारी परतावे लागले.

ही एबी डिविलियर्सची शतक झळकावण्याची पहिलीच वेळ नाही. याआधी इंग्लंड चॅम्पियन्स संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात त्याने ४१ चेंडूत शतक झळकावले होते. वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लेजेंड्स स्पर्धेत सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तो अव्वल स्थानी आहे. आतापर्यंत त्याने ३०३ धावा केल्या आहेत.

# शुबमन गिलने घडवला इतिहास

## ७००हून अधिक धावा करणारा पहिला भारतीय कर्णधार



**लंडन : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत शुबमन गिलने आपल्या फलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. शुबमन गिलच्या सातत्यपूर्ण फलंदाजीने विक्रमांची रांग लावली आहे. प्रत्येक शानदार खेळीदरम्यान त्याने नवनवीन विक्रम आपल्या नावे केले आहेत. मँचेस्टर कसोटीतही कमालीची फलंदाजी करत त्याने भारतीय संघाचा डाव सावरला आहे. या खेळीदरम्यान अनोखी कामगिरी करणारा तो पहिला भारतीय कर्णधार ठरला आहे.

शुबमन गिलने इंग्लंडविरूद्ध मालिकेत ७०० धावांचा टप्पा पार केला आहे. शुबमन गिल इंग्लंडमध्ये कसोटीत अशी कामगिरी करणारा आशियातील पहिला फलंदाज ठरला. त्याने संयमी फलंदाजी करत प्रसंगी आक्रमक फटके खेळत संघाचा डाव सावरत आपली खेळी साकारली.

भारताचा कर्णधार शुभमन गिल विदेशात कसोटी मालिकेत ७००पेक्षा जास्त धावा करणारा पहिला भारतीय कर्णधार बनला. चौथ्या कसोटी सामन्यादरम्यान त्याने हा टप्पा गाठला. २५ वर्षीय गिलने एकाच कसोटी मालिकेत ७००पेक्षा जास्त धावा करणाऱ्या कर्णधारांच्या यादीत दाखल झाला, ज्यामध्ये सर डॉन ब्रॅडमन (दोनदा), सर गारफिल्ड सोबर्स, ग्रेग चॅपेल, सुनील गावसकर, डेव्हिड गोवर, ग्राहम गूच आणि ग्रॅमी स्मिथ यांचा समावेश आहे.

गावसकर आणि यशस्वी जैस्वाल यांच्यानंतर एका कसोटी मालिकेत ७०० धावांचा टप्पा ओलांडणारा गिल हा आता तिसरा भारतीय ठरला आहे. ओल्ड ट्रॅफर्ड येथे भारताच्या दुसऱ्या डावात त्याने केलेल्या शानदार खेळीनंतर त्याने हा विक्रम केला. चौथ्या कसोटी सामन्यात फलंदाजीला उतरण्यापूर्वी गिलने सात डावांमध्ये ६१९ धावा केल्या होत्या, ज्यामध्ये एजबॅस्टन येथे कारकिर्दीतील सर्वोत्तम २६९ धावांच्या खेळीचा समावेश आहे.

२०१४च्या इंग्लंड दौऱ्यातील विराट कोहलीच्या ६९२ धावांच्या विक्रमाला मागे टाकण्यासाठी त्याला ७४ धावांची आवश्यकता होती आणि ७०० धावांचा टप्पा गाठण्यासाठी त्याला ८१ धावांची आवश्यकता होती. मँचेस्टर कसोटीत दुसऱ्या डावाच्या पहिल्याच षटकात दोन विकेट गमावल्यानंतर गिल फलंदाजीला उतरला. त्याने केएल राहुलसह १८० धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचली.






### बॅडमिंटन खेळताना तरुणाचा मृत्यू

**हैदराबाद :** नागोले स्टेडियममध्ये मित्रांसोबत बॅडमिंटन खेळताना २५ वर्षीय तरुणाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. मृत युवकाचे नाव गुंडला राकेश असून, तो खम्मम जिल्ह्यातील तल्लाडा गावचे माजी उपसरपंच गुंडला वेंकटेश्वरलू यांचा मुलगा होता. बॅडमिंटन खेळताना अचानक अस्वस्थ झाल्यावर त्याला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com